नगर वाचनालय, सातारा

# हरिश्चंद्र कृष्ण जोशी

## ह्यांचें चरित्र.

च
३०७

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088473

विनायक कोंडदेव ओक

ग्रंथ स्थानांक - च ३०७
नगर
दाखल नं. ५५८७३
वाचनालय
पाने - ९४
सातारा
किंमत -
दिनांक -

ह्यांनीं लिहिलें.


ते

मुंबईंत

निर्णयसागर छापखान्यांत छापिलें.

---

१९०६.



uichund Crustna

ह्या पुस्तकाच्या संबंधाचे सर्व हक्क **मोरेश्वर हरिश्चंद्र जोशी**
ह्यांनीं राखून ठेविले आहेत.

# प्रकाशकांची विनंति.

पुत्रधर्मास स्मरून, आमच्या तीर्थरूपांच्या संबंधानें त्यांच्या पश्चात्, त्यांच्या स्मरणार्थ आणि लौकिकार्थ, इष्टमित्रांच्या आणि आप्तांच्या सूचनांवरून, जें काय करावेंसें आह्मांस वाटलें, त्यांतलेंच हें एक चरित्र आहे. वास्तविक पाहिलें असतां, त्यांच्या वयाच्या आणि वैभवाच्या मानानें, हें बरेंच मोठें व्हावयास पाहिजे होतें. परंतु, त्याविषयींचे लेख ठेवण्याचा परिपाठ आमच्यांत नाहीं, त्यामुळें तसें करण्यास साधन नाहीं, त्यास उपाय नाहीं. तरी, आमचे पुतण्ये चि. रा. केशवराव आनंदराव जोशी, बी. ए. ह्यांच्या उद्योगानें आणि साह्यानें आह्मांला जें साहित्य मिळालें आणि ठाऊक होतें, तें सगळें आह्मीं आमचे मित्र रा. रा. विनायक कोंडदेव ओक ह्यांच्या स्वाधीन केलें, आणि त्यांस चरित्र लिहिण्यास आग्रहपूर्वक सांगितलें. त्यांनीं आमच्या शब्दास मान देऊन, त्यास हें स्वरूप दिलें आहे. हें आह्मांला तर वंदनीय आहेच, पण तसेंच हें इतर वाचणाऱ्यांसही बोधप्रद व्हावें, अशी आमची इच्छा आहे. ती देव पूर्ण करो.

मुंबई,
डिसेंबर, १९०६.
} मोरेश्वर हरिश्चंद्र जोशी.

# अर्पणपत्रिका.



" पत्रं पुष्पं फलं तोयं " ह्या न्यायानें,

हें अल्प चरित्र,

आधीं परवानगी घेऊन, अत्यंत पूज्यबुद्धीनें, सन्मानपूर्वक,

आमच्या तीर्थरूपांचे फार जुने, थोर आणि

सर्वमान्य मित्र,

**सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, नैट,**

ह्यांस

**अर्पण केलें आहे.**

सेवक,

**मोरेश्वर हरिश्चंद्र जोशी.**

# चरित्रलेखकाची सूचना.

मालकानें सोनें, हिरे माणकें इत्यादि सगळें साहित्य द्यावें, आणि त्याचा दागिना सोनारानें यथाशक्ति चांगला बनवावा, ह्यामध्यें दागिन्याच्या मोलाचें मुख्य मोठेपण मालकाचें असतें, आणि सोनाराचें मेहेनतीपुरतें असतें, हें सर्वांस ठाऊकच आहे. ह्यावरून माझ्या लिहिण्याचा आशय लक्षांत येईल.

आणखी, त्यांतही त्या दागिन्याची किंमत मोठी होण्यास तें साहित्य तसेंच उत्तम लागतें. तें, प्रकृत प्रकरणीं, मालकाच्याही हातीं मिळवायाचें नसतें. तें आधींच पुण्यश्लोकांनीं मिळवून किंवा सिद्ध करून ठेविलेलें असतें. तें पुढें करणें आणि त्याची जुळाजूळ करणें एवढेंच कायतें मालकाकडे असतें. पण, तेंही करण्याची बुद्धि होण्यास पूर्वपुण्याई लागते, ईश्वरी कृपा लागते. ती माझे मित्र रा. रा. मोरेश्वर हरिश्चंद्र जोशी व रा. रा. केशव आनंदराव जोशी ह्यांस देवानें दिली आहे, आणि तिचा उपयोग त्यांनीं चांगला केला आहे, असें सांगून, आणि ह्या पुस्तकांत जर कांहीं गुण असला, तर त्याची वांटणी ह्या धोरणानें करण्याविषयीं वाचकांस प्रार्थना करून, ही सूचना मी संपवितों.

मुंबई,
डिसेंबर, १९०६. } वि. कों. ओक.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| **पहिला.** | —विषयमाहात्म्य. ... ... ... ... ... | १ |
| **दुसरा.** | —ठावठिकाण आणि पूर्वपीठिका. ... ... ... | ६ |
| **तिसरा.** | —जन्म आणि बालपण. ... ... ... ... | १५ |
| **चवथा.** | —राजसेवा. ... ... ... ... ... ... | २६ |
| **पांचवा.** | —गुणगौरव. ... ... ... ... ... ... | ३८ |
| **साहावा.** | —मानपान. ... ... ... ... ... ... | ४६ |
| **सातवा.** | —दानधर्म. ... ... ... ... ... ... | ५० |
| **आठवा.** | —अंतकाळ आणि स्वभाव. ... ... ... ... | ५६ |
| **नववा.** | —त्यांच्या कांहीं विशेष गोष्टी. ... ... ... ... | ६२ |
| **दाहावा.** | —त्यांविषयीं जन काय ह्मणतें.... ... ... ... | ६७ |
| **अकरावा.** | —उपसंहार. ... ... ... ... ... ... | ८६ |

Presented to
[redacted] Satara City General Library, Satara Esq.
with the best Compliments of
M. H. Joshi.
12 Kalbadevi
Bombay

# हरिश्चंद्र कृष्ण जोशी.

## भाग पहिला.

### विषयमाहात्म्य.

प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला
तो नर भला भला भला.

शिवदिनकेसरी.

संसारार्णवीं भिजा गड्यांनो संसारार्णवीं भिजा
परंतु परमार्थातें साधा यांतचि आहे मजा.

अनंतफंदी.

ज्ञानपंथ निर्वाणद जेणें सांख्य मुक्त जाहले
कर्मे योगि मोक्ष पावले.
मार्ग दोन अपवर्गदायि हे लोकांमाजी भले
पार्था त्यांचि पूर्वि बोलिले.

गीतामृतशतपदी.

संसार परमार्थ दोनी एकचि काळीं भोगितो ज्ञानी
सरोवरामधिं अर्ध बुडाला अनुभवि जैसा कोणी
वरि ऊन खालतीं शीतळ पाणी.

बाबा गर्दे.

प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही योग माणसाला असतात. त्यांपैकीं त्याची आणि प्रपंचाची गांठ जन्म झाल्याबरोबर पडते. त्याविषयींचें त्याचें प्रेम त्याच्या वयाबरोबर वाढत जातें. तें इतकें कीं त्याच्या प्रादुर्भावानें त्याला परमार्थ दिसेनासा होतो. तरी, तो त्याला सोडून गेलेला असतो, असें नाहीं. अल्प प्रमाणानें तो त्याच्या बरोबर असतोच. हें सुजाण माणसाला पावलोपावलीं कळत असतें. आणि, प्रपंचानें जीवाची तृप्ति होत नाहीं, प्रपंचानें शांति येत नाहीं, असें माणसाला वाटल्यावर मग, त्याला परमार्थाकडे वळावें लागतें, आणि त्याच्या भक्तीस लागून, आपलें उणें असतें तें पूर्ण करून घ्यावें लागतें. त्याशिवाय त्याचें चालतच नाहीं. तोच संन्यास. त्यालाच चतुर्थाश्रम ह्मणतात. हें व्यावहारिक सामान्य जनमत झालें.

सुज्ञमत असें आहे कीं, प्रपंच आणि परमार्थ हे मुळींच वेगळे नाहींत. ते एकच आहेत. कावळ्याचे डोळे दोन दिसतात. पण त्यांला बुबुळ एक असतो, तो एकदां ह्या डोळ्यांत येतो, आणि लगेच पुनः दुसऱ्यांत जातो ह्मणतात. आंबा कोंवळा असतो, तेव्हां आंबट असतो, पण तोच पिकला ह्मणजे अमृतासारखा गोड लागतो. त्याच न्यायानें, परमार्थ हा प्रपंचाहून किंवा प्रपंचापासून कांहीं वेगळा नाहीं; तर, उत्तम प्रकारें प्रपंच करणें तोच परमार्थ होय. ह्मणजे, प्रपंचाचें जें अत्युत्तम स्वरूप त्यालाच परमार्थ ह्मणावयाचें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

तरी, प्रपंच आणि परमार्थ ह्यांच्यामध्यें अंतर फार मोठें आहे, असें थोर पुरुष समजतात. तें अंतर तोडण्यास बरीच तपश्चर्या लागते. तितकी एकदम कोणाला साधत नाहीं. प्रापंचिक स्थितींत परमार्थीपणा आंगीं आणणें हें घातुक होतें. ह्मणून, तितकी तयारी नसतां, परमार्थित्वाच्या अल्पस्वल्प बाह्य साधनांस स्पर्शही करूं नये, असें संतांचें ह्मणणें आहे:—

अभंग.

सदा सर्वकाळ अंतरीं कुटिल तेणें गळां माळ घालूं नये. १.
ज्यासी नाहीं धर्म दया क्षमा शांति तेणें अंगा विभूति लावूं नये. २.
जयासी न कळे भक्तीचें महिमान तेणें ब्रह्मज्ञान बोलूं नये. ३.
ज्याचें मन नाहीं लागलें हातासी तेणें प्रपंचासी टाकूं नये. ४.
तुका ह्मणे नाहीं ज्यासी हरिभक्ति तेणें भगवें हातीं धरूं नये. ५.

हा बोध अत्युत्तम आहे. हा न ऐकतां जे कोणी दांभिक जन जगास नाडायास पाहतात, त्यांचें कसें होतें, हें ह्याच सत्पुरुषानें वर्णिलें आहे:—

अभंग.

एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां हाणोनीयां लाता पळालें तें. १.
गाढवही गेलें ब्रह्मचर्य गेलें तोंड काळें झालें जगामाजी. २.
होणार तें झालें हें ना तेंसें केलें तुका ह्मणे गेलें वायांची तें. ३.

ह्मणूनच खरे विचारी पुरुष परमार्थ साधण्याकरितां प्रपंचाचा त्याग करण्याच्या भरीस पडत नाहींत. एक तर तो बाळपणापासून हाडीं खिळलेला असतो. त्यांतलें सुख सध्या मिळत असतें, आणि परमार्थांतल्या सुखाविषयीं नुसत्या

कल्पना असतात. आणखी, विचार करून पाहतां, प्रपंच आहे, त्याच्याच आधारावर जगांत परमार्थ चालला आहे. हा प्रपंच जर अजीं नाहींसा झाला, तर परमार्थाला मुळीं थाराच मिळावयाचा नाहीं, आणि प्रपंचाच्या साह्यावांचून परमार्थ मुळीं जगायाचाच नाहीं. सगळेच जर गोमुखींत हात घालून एकसारखे तपश्चर्येला बसले, तर ह्यांच्या पोटास पाहिजे तें धान्य पिकवावें कोणीं, आणि त्यांना छाट्या पाहिजेत त्यांचें कापड विणायाचें कोणीं? शिवाय प्रजोत्पत्ति व्हावयाची कशी!

तेव्हां एकंदरींत तात्पर्य हें कीं, प्रपंचाशिवाय परमार्थ नाहीं. तुकाराम महाराजांनीं परमार्थ साधिला आहे, ह्याविषयीं कोणासही शंका नाहीं. पण त्यांनीं कांहीं प्रपंच टाकिला नव्हता. श्रीसमर्थ रामदास ह्यांनीं लग्नकार्य केलें नव्हतें, एवढेंच कायतें; बाकी व्यवहारांत त्यांनीं प्रपंच अगदीं सोडून दिला होता, असें ह्मणतां येत नाहीं. कदाचित् प्रपंचांतलें अत्युच्च अंग जें राजकारण, तें त्यांनीं हातीं घेतलें होतें. तरी, त्यांनीं परमार्थ साधिला आहे, ह्यांत शंका नाहीं. श्रीशिवाजी महाराजांनीं जवाहीर पाठविलें होतें, तें तुकाराम महाराजांनीं परत केलें, पण भिक्षा सोडिली नव्हती. समर्थांनीं राज्याची भिक्षा नको ह्मटली, पण, राष्ट्रहित कसें साधावें, हें सांगण्याचें–उपदेश करण्याचें सोडिलें नव्हतें. एके वेळीं तुकाराम महाराजांच्या एका मुलास मुतखडा झाला, आणि

त्याच्या योगानें तो अतिशयित अशक्त होऊन मरायास टेंकला. तें पाहून महाराजांची बायको फार घाबरी होऊन हंबरडा फोडून रडूं लागली. तिला महाराजांनीं, अगदीं शांतपणें ह्मटलें, "अग, एवढा आक्रोश कशाला करतेस! करायाचे उपाय ते केले आहेत. देवाच्या इच्छेप्रमाणें व्हायाचें तें होईल. हा मुलगा गेलाच, तर ह्याच्या शुश्रूषेकडे जो वेळ आपणांस घालवावा लागतो तो आपण ईश्वरभजनांत घालवूं! पुत्रसेवेपेक्षां देवसेवा श्रेष्ठ नव्हे का!" ह्या बोलण्यांतलें तात्पर्य एवढेंच घ्यावयाचें कीं, तुकाराम महाराजांच्या जीवाचा ओढा प्रपंचापेक्षां परमार्थाकडे अधिक होता. आणखी, अनुभवावरून व इतिहासावरून असें स्पष्ट कळलें आहे कीं, ज्यांचा ओढा परमार्थाकडे विशेष असतो, त्यांचा प्रपंच आपोआपच निष्पाप चालतो, आणि तेच जनांच्या उपयोगीं फार पडतात. हें तत्त्व, आजपर्यंत होऊन गेलेल्या सगळ्या थोर पुरुषांच्या चरित्रांत विद्यमान आहे. ते जीवंत असतां त्यांचा ओढा परमार्थाकडे असतो, ह्यांत कांहीं नवल नाहीं. पण, ते हें जग सोडून गेल्यावरही त्यांच्या ज्या कृति लोकांस दृश्यमान होतात, त्यांमध्येंही हें तत्त्व जीवंत आढळतें. आणि तें प्रपंची जनांच्या कानउघाडणीस कारणीभूत होत असतें. ह्याचीं उदाहरणें पंढरपुरच्या यात्रेमध्यें पुष्कळ दृष्टीस पडतात. त्यांवरून असें ह्मणावें लागतें कीं, असे जे कोणी संत जन गत झालेले आपणांस दिसतात, ते गत झाले

नाहींत. ते आपल्या प्रभावरूपानें जीवंत आहेत, आणि आपलें इष्ट व्रत अद्याप एकसारखें चालवीत आहेत. आणि जगाच्या कल्याणार्थ सत्पुरुषांचें हें व्रत असेंच निरंतर चालावें, अशी योजना जगदीश्वरानें करून ठेविली आहे. तिचीं अनेक उदाहरणें जगांत जागोजाग होत असतात. त्यांत कांहीं लहान असतात, कांहीं मोठीं असतात. तरी तीं, आपापल्यापरी जनांचे डोळे उघडण्यास आणि सन्मार्ग दाखविण्यास नित्य उपयोगीं पडतात. त्यांतलेंच एक लहानसें उदाहरण हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांचें चरित्र आहे. तें येथें थोडक्यांत सादर करावयाचें योजिलें आहे. ह्याचा हेतु परमेश्वर पूर्ण करो.

---

## भाग दुसरा.

### ठावठिकाण आणि पूर्वपीठिका.

आमच्या देशाचा प्राचीन इतिहास लिहिलेला नाहीं, आणि तो सिद्ध करण्याचें साहित्यही फार कोठें आढळत नाहीं, ही एक मोठी उणीव आहे. हिजविषयीं फार वाईट वाटतें. पण ही भरून निघण्याची आशा नाहीं. आकाशांतले फार अंतरावरचे तारे माणसांस दिसत नव्हते; ही अडचण दुर्बिणीच्या युक्तीनें दूर झाली आहे;

नगर वाचनालय, सातारा

आणि अत्यंत सूक्ष्म पदार्थ दिसत नव्हते, ती अडचण सूक्ष्मदर्शक यंत्रानें दूर झाली आहे. तशी इतिहासांतली ही अडचण दूर होण्याची आशा नाहीं. कां कीं, गोष्टी घडून गेल्या आहेत; आणि त्यांचा मागमूसही राहिला नाहीं. तेव्हां त्या कळण्यास मार्ग राहिला नाहीं. त्यास उपाय नाहीं. शिवाय, आमच्या प्राचीनांनीं आपले वृत्तांत लिहून ठेविले नाहींत, ह्याबद्दल त्यांनाही कांहीं शब्द लावितां येत नाहीं. कां कीं, तेव्हां इतिहास लिहून ठेवण्याचा परिपाठ नसून, इतिहास लिहिणें हें विद्येचें आणि स्वस्थपणाचें काम आहे. गोष्टींचें वर्णन कसें करावें तें कळलें पाहिजे, आणि त्यास अवकाश पाहिजे. हीं दोन्हीं आपल्या राष्ट्रांत प्राचीन काळीं कमी होतीं. लिहिणारे अगदीं थोडे होते, आणि राज्यपद्धतीच्या अस्थिरतेमुळें नेहमीं धास्ती व गडबड असून, इकडून तिकडे आणि तिकडून दुसरीकडे प्रयाण करणें भाग पडे. त्यांत कसलें लिहिणें आणि कसलें काय! कोणीकडून जीव राखून दिवस काढावयाचे असत.

आणखी चरित्रनायकाचा कुलवृत्तान्त सांगायास ज्या प्रसंगाचें वर्णन करावयाचें आहे, तो असाच होता. दक्षिणेंत दौलताबादेस रामदेवराव हा राजा राज्य करीत होता. त्याच्या कांहीं ध्यानीं मनीं नसतां, कोरा व अलाहाबाद ह्या प्रांतांवरचा मोंगलांचा सुभेदार जलालुद्दीन याचा पुतण्या अल्लाउद्दीन ह्यानें आठहजार सैन्यासहवर्तमान, इ० स० १२९४ त, दक्षिणेवर स्वारी केली. ती स्वारी ह्मणजे

मेंढरांच्या कळपावर लांडग्यांची उडी पडावी तशी होती. रामदेवराजाचा पराभव झाला, आणि त्याचा दुसरा मुलगा भीमदेव जो तेथून निघाला, तो मुंबईनजीक माहीम येथें येऊन राहिला. त्याच्या समागमें पुष्कळ लोक येऊन तेथें स्थायिक झाले. त्यांतच माध्यंदिन शाखेचे यजुर्वेदीपळशी-कर ब्राह्मण होते. ह्या ब्राह्मणांचें प्रस्थ त्या राज्यांत फार मोठें होतें. त्यांतल्या कितीएकांना मोठमोठ्या कामांवर नेमिलें होतें. त्यांमध्यें पुरुषोत्तमपंत कावळे हे तर राजगुरु होते.

चौदाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास चरित्रनायकाचे जे मूळपुरुष, हल्लीं निझामच्या हद्दींत असलेल्या बिडाहून निघून केळवेंमाहिमास येऊन राहिले, त्यांचें नांव त्रिंबक गंगाधर जोशी शासनकर असें होतें. त्यांना आणि त्यांच्या वंशजांना पूर्वोक्त-पुरुषोत्तमपंत राजगुरूंच्या आश्रयानें केळवेंमाहिमाच्या आस-पासच्या ३६० गांवांची उपाध्येपणाची वृत्ति मिळाली होती. ती त्यांजकडे कितीएक पिढ्या चालल्यावर, इ० स० १४९५ ह्या वर्षीं, त्रिंबक नारायण ह्या नांवाचा कोणीएक आश्वलायन ब्राह्मण ह्या वृत्तीवर आपला हक्क सांगूं लागला. त्या वादाचा निर्णय, सगळे कागदपत्र वगैरे नीट पाहून, दमणचे नबाब चांदखान ह्यांनीं, कान जोशी दादा जोशी शासनकर ह्यांच्या वतीनें केला, आणि त्यांस त्याबदल शिरपाव आणि सनद सहीशिक्यानिशीं देऊन, त्या सनदेंत दिलेली इनाम जहागीर त्यांकडे अविच्छिन्न चालावी असें ठरविलें.

ह्यानंतरचा सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंतचा कुलवृत्तांत उपलब्ध नाहीं. इ० स० १६९० ह्या वर्षी, चरित्रनायकाचे मूळपुरुष मुंबईस येऊन स्थायिक झाले. तेव्हां मुंबई ही इंग्लिशांस नुकतीच मिळालेली होती, आणि तिजमध्यें बाहेरचे पुष्कळ दुसरे लोक येऊन राहूं लागले होते. त्यांत प्रख्यात असे ह्मटले ह्मणजे रुस्तमजी दोराबजी, लवजी नसरवानजी वाडिया (नामांकित वाडिया कुलाचे मूळ पुरुष), रूपजी धनजी (वरजीवनदास माधवदास, सर मंगळदास नथूभाई, व सर हरकिसनदास नरोत्तमदास ह्यांचे पूर्वज), कृष्णाजी गोविंद जोशी (चरित्रनायकांचे पूर्वज), धाकजी परभू, बापू शेणवी, माधवजी तानकोजी, आणि बळवंत शेट गंगाधरशेट (जगन्नाथशंकरशेटचे पूर्वज) हे होत. ह्यांचे वंशज मोठे पराक्रमी आणि श्रीमंत निपजून मुंबईमध्यें मोठा नांव लौकिक मिळवून राहिले, हें प्रसिद्धच आहे.

ही इतकी मंडळी त्या वेळीं बाहेरच्या प्रदेशांतून निघून मुंबईस येऊन राहिली. ह्याचें कारण असें आहे कीं, त्या वेळीं भोंवतालीं बहुतेक सगळा प्रदेश पोर्तुगीज लोकांनीं व्यापला होता. त्यांच्या अमलांत बंदोबस्त चांगला नव्हता. त्यामुळें लोकांच्या मनांत नेहमीं धास्ती असे. आणि इंग्लिशांच्या प्रांतांत स्वस्थता आणि सुरक्षितता परिपूर्ण असल्याचा लौकिक झाला होता, आणि अनुभव येत होता, त्याच्या योगानें त्यांस इकडे येऊन राहावेंसें वाटलें. आणखी तिकडे असा जुलूम

चालला होता कीं, एकादा कोणी हिंदू मेला कीं तेथले पोर्तुगीज धर्मोपदेशक त्याच्या मुलांस बेलाशक ख्रिस्ती करून टाकीत. ह्याविषयीं लोकांस फार वाईट वाटत असे. शिवाय, त्या वेळीं मुंबईमध्यें उदर, मुतखडा, क्षय, हातपाय जाणें, नानाप्रकारचे ज्वर, पाय मोठे होणें, अतिसार इत्यादि रोगांचें प्राबल्य मनस्वी होतें. त्यामुळें तेथें वैद्यकीचा धंदा फार चांगला चालत असे. आणि कृष्णाजी गोविंद जोशी हे वैद्य होते. तेव्हां, ह्या कारणांवरून त्यांस मुंबईत येऊन राहाणें सोईचें वाटलें, हें साहजिकच होतें.

शिवाय, त्या वेळीं गोरे डाक्तर मुंबईत फार नव्हते. त्या योगानें जोशीबावांस आणि इतर वैद्यांस गिऱ्हाइकें पुष्कळ मिळत, आणि त्यांस कमाई चांगली होई. ती केवळ एतद्देशीय लोकांकडूनच होई असें नाहीं. त्या वैद्यांचा लौकिक ऐकून युरोपियन रोगीही त्यांजकडे औषधोपचारार्थ येत असत, आणि त्यांची चांगली संभावना करीत असत, ह्यांत कांहीं नवल नाहीं. बरें करील तो वैद्य चांगला वाटावा, आणि त्या प्रकरणीं त्याच्या जातिधर्माकडे लक्ष जाऊं नये, ही वृत्ति साहजिक आहे.

त्यांतही हे जोशीबावा वैद्य फारच लोकप्रिय झाले होते. ह्याचें कारण असें होतें कीं, हे रोग्यांस फार ममतेनें वागवीत असत, आणि गरीबगुरीबांस औषधें फुकट देत असत, एवढेंच केवळ नव्हे, तर बाहेरगांवच्या गरीब रोग्यांस वाटखर्चास आणि भाड्यातोड्यास पदरचे पैसे मोठ्या संतोषानें देत

असत. त्यावरून लोक त्यांचे फार गुण घेत असत, आणि त्यांस भजत असत. हे वैद्यबावा, मोठा नांवलौकिक मिळवून, चांगलें घरदार करून, इ० स० १७२० ह्या वर्षीं मरण पावले. त्या वेळीं त्यांचें वय साठ वर्षांचें होतें. ह्यांच्या वेळेपासून वैद्यकीविषयीं ह्या घराण्याची मोठी आख्या झाली.

कृष्णजोशांचे चिरंजीव धर्मजोशी, हेही चांगले हुशार होते. ते आपल्या वडिलांस वैद्यकीच्या कामांत पुष्कळ साह्य करीत असत. तेही चांगले वैद्य होऊन, तो धंदा चालवीत होते. ते, ७५ वर्षांचे होऊन, इ० स० १७७५ ह्या वर्षीं निवर्तले.

धर्मजोशांस तीन मुलगे; हरजोशी, सदाशिवजोशी आणि गोविंदजोशी. हे गोविंदजोशी नेहमीं केळवेंमाहिमास राहात असत. आणि सदाशिवजोशी हे मुंबईस घरीं राहून, हरजोशांस साह्य करीत असत. हे हरजोशी फार लौकिकास चढले. ह्यांचें जन्म इ० स० १७३५ झालें होतें, आणि ह्यांनीं वैद्यकाचे बहुतेक ग्रंथ ह्मटले होते. त्यांनीं आपला वडिलोपार्जित वैद्यकीचा धंदा मोठ्या दक्षतेनें, आणि प्रामाणिकपणानें चालविला. त्यांजकडे मुंबईतल्या खेरीज बाहेरचे दूरदूरचे रोगी औषधोपचारार्थ येत असत, आणि त्यांच्या घरीं राहात असत. आणि हे वैद्यबावा, आपल्या वडिलोपार्जित लौकिकाप्रमाणें, गरीब रोग्यांस फुकट औषधें देऊन, शिवाय परत गांवीं जाण्याच्या खर्चास पदरचे पैसे देत असत. ह्याबद्दल त्यांस एका तैलंग ब्राह्मणाकडून संस्कृतांत पत्र आलें

होतें. तें कोठें सांपडत नाहीं, ह्याचें वाईट वाटतें. तें जर सांपडतें, तर हे वैद्यबावा किती दयाळु होते हें विशेष प्रकारें कळून आलें असतें. ह्या संबंधानें "मुंबईनो बहार" ह्या गुजराथी पुस्तकांत लिहिलें आहे, तेंही वाचण्यासारखें आहे:—

जे दुरी देशनो गरीब दरदमां फशे ॥
ते मुंबईमां हरजोशी पाशे जशे ॥
माहवजत जेनी जां हां पीता पेरे थाय ॥
रेहे तांहांसुधी ते मुफतनुं खाये ॥
घणाओए तेवणनो आसरो लिधो ॥
वतन जाये तारे तो सामण सीधो ॥
ते साथे रस्तानो जोईतो खरच ॥
लईने जालवता पोतीकी गरज ॥
जेओ देशमां जईने मांगता दुवा ॥
हरजोशीने माटे लाम्बा उवा ॥
एवा नरनी कीर्तीबी गवायेली छे ॥
सखावतनी डाहाली हींआं ववायेली छे ॥

आगगाडी होण्याच्या आधीं प्रवासी लोकांस मार्गांत प्यावयास पाणी मिळत नसे, आणि त्यामुळें त्यांचे फार हाल होत. ते दूर करण्यास हरजोशांनीं ठाणें जिल्ह्यांत केळवेंमाहिमास कांहीं विहिरी खणल्या, त्यांवरून त्यांचा मोठा लौकिक झाला. आणखी असेंही सांगतात कीं, तेव्हां वसईचे सुभेदार विसाजीपंत लेले ह्मणून कोणी मोठे गृहस्थ होते, त्यांच्या वशील्यानें हरजोशांचा प्रवेश श्रीमंतांपर्यंत

झाला होता. आणि त्यांनीं जोशीबावांस शालजोडी देऊन त्यांचा मोठा सत्कार केला होता. ह्यावरून असें दिसतें कीं, हरजोशांचें वजन पुष्कळच वाढलें होतें, आणि श्रीमंतांच्या दरबारांत सार्वजनिक हिताचीं कामें करणाऱ्यांचा चांगला गौरव होत असे.

हरजोशी हे कांहीं फार श्रीमंत नव्हते; तरी, ते नेहमीं परोपकाराचीं कामें करीत असत, आणि लोकांत संभावित रीतीनें वागत असत. त्याच्या योगानें ते मोठे धनाढ्य आहेत, असा त्यांचा लौकिक झाला होता. "मुंबईनोबहार" ह्या ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, हे हरजोशी काळकादेवी रस्त्याच्या ज्या भागीं राहात असत, त्या भागास हरजोशी रस्ता असें नांव पडलें होतें. तेथें पुढें काळकादेवीचें देऊळ बांधिल्यावर त्याला काळकादेवी रस्ता ह्मणूं लागले. ह्यावरून एक मोठें तात्पर्य असें ध्यावयाचें कीं, पैशाचा खरा उपयोग मनुष्यास त्याच्या सद्व्ययानें होत असतो, तितका संग्रहानें होत नाहीं.

हे हरजोशी, आनंदानें प्रपंच करून, आणि आपल्या कुळाचें नांव गाजवून, इ० स० १८१५ ह्या वर्षीं मरण पावले. तेव्हां त्यांचें वय ऐशीं वर्षांचें होतें. ह्यांनीं एक मुलगा दत्तक घेतला होता. त्याचें नांव कृष्ण जोशी. हा ह्या वेळीं तेवीस वर्षांचा होता. हेच कृष्ण जोशी आतां मुख्य कर्ते पुरुष झाले.

पाणी वाहण्याच्या पाटाचा बांध भक्कम असला ह्मणजे पाणी नीट वाहात राहातें, इकडे तिकडे फुटत नाहीं. त्याप्रमाणें कुटुंबांत शिस्त उत्तम लावून ठेविलेली असली ह्मणजे

त्यांतलीं माणसें आपोआप चांगलीं निपजतात. त्यांत अंतर पडत नाहीं. ह्या कृष्ण जोशांस हरजोशांनीं प्राणोत्क्रमणाचे वेळीं बोध केला होता कीं, "बाबा, कृष्णा आह्मीं जशी वर्तणूक केली, तशी तुह्मीं वर्तणूक करून युक्तीनें कालदेशवर्तमानानुरूप संसार करावा. अपकीर्ति होईल तें कधीं करूं नये." पंतांची एक आर्या आहे:—

गति उत्तम होय असें वर्तावें धर्मनीति रक्षावी
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी.

असाच हा बोध आहे. ह्या बोधाचें चांगलें सार्थक झालें. हर जोशांच्या पश्चात कृष्ण जोशांनीं मोठ्या मेहेनतीनें, युक्तीनें आणि शाहाणपणानें आपला वडिलोपार्जित वैद्यकीचा धंदा उत्तम प्रकारें चालविला. ते चांगले वैद्य ह्मणून त्यांचा मोठा लौकिक झाला. त्यांजकडे जगन्नाथ शंकर शेट, माधवदास रणछोडदास, मोतीशा आमीचंद, जव्हेरचंद आत्माराम, व्हिकाजी मेहेरजी इत्यादि मोठमोठे सन्मान्य, राजमान्य, आणि लोकमान्य पुरुष औषधोपचारार्थ येऊं लागले, व त्यांकडून त्यांस वर्षासनें मिळूं लागलीं. ह्याप्रमाणें त्यांचें सर्व कांहीं अत्युत्तम प्रकारें चाललें असतां, त्यांस एकाएकीं, इ० स० १८२८ ह्या वर्षीं देवाज्ञा झाली, आणि घरांत अगदीं अंधार पडल्यासारखा झाला. कां कीं, त्यांचें दुःख करण्यास त्यांची विधवा स्त्री आणि तीन वर्षांचा एक अशक्तसा मुलगा मात्र राहिला. हा मुलगा हाच ह्या चरित्राचा नायक होय.

येथें पूर्व पीठिका संपली. आणि येथूनच खरोखर हरिश्चंद्र कृष्ण ह्यांच्या चरित्रास आरंभ झाला ह्मणावयाचा. त्याचा उपक्रम पुढच्या भागीं करूं.

---

## भाग तिसरा.

### जन्म आणि बालपण.

मनुष्य स्वतंत्र आहे, आणि त्याचें स्वतःचें कल्याणाकल्याण त्याच्या स्वतःच्या हातीं आहे, ह्या ज्या गोष्टी आहेत, त्या, तो चांगला मोठा आणि समंजस झाल्यावरच्या आहेत. जन्म, बालपण, इत्यादि ज्या अवस्थांतून त्यास तत्पूर्वी पार पडावें लागतें, त्या अवस्था दैवाधीन किंवा ईश्वराधीन असतात. त्यांवर तें पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. देव घालील तेथें जन्मास यावयाचें, आणि योग घडतील तदनुरूप बालपण घालवायाचें, ह्यांत सगळें पारतंत्र्य असतें. पण त्यांतही कांहीं ईश्वरी सूत्र असतें असें वाटतें. लहानपणांत शिक्षा एका प्रकारची आणि परिणाम दुसऱ्या प्रकारचा असें कधीं कधीं होतें. असें जर नसतें, आणि जर हें माणसांच्या स्वाधीनचें असतें, तर, श्रीछत्रपति शिवाजी महाराज ह्यांचे चिरंजीव संभाजी महाराज इतके दुर्वृत्त निघाले नसते, तसेंच अहल्याबाईसाहेब होळकरीण, ह्मणजे अत्यंत पवित्र

आणि सुशील साध्वी, तिचा पुत्र मालेराव इतका दुष्ट निघाला कीं, तो तिला नकोसा झाला, हें घडलें नसतें. अशीं लहानसान शेंकडों उदाहरणें आहेत. त्याप्रमाणेंच, ह्यांच्या उलटही अशीं उदाहरणें अनेक आहेत कीं, लहानपणीं कोणी सांगता शिकविता नसतां, आणि आंवर घालता नसतां, मुलें, आपल्या स्वयंभु सद्वृत्तीच्या प्रभावानें ह्मणा किंवा कुलपरंपरागत सदाचारवृत्तीच्या ओघानें ह्मणा, अशीं उत्तम माणसें निपजतात कीं, त्यांची गणना इतिहासांतल्या श्रेष्ठ माणसांत झालेली आहे. बाळाजी विश्वनाथ, सर सालरजंग, रामशास्त्री, बोनापार्ट, महादेव मोरेश्वर कुंठे, इत्यादि मंडळी ह्याच प्रकारची होय. ह्यांतच आमच्या चरित्रनायकांची गणना आह्मी करितों.

हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांचें जन्म मुंबई येथें, भाद्रपद वद्य १०, शुक्रवार, शके १७४७, ह्मणजे, इ० स० १८२५ च्या आक्टोबर महिन्याची सातवी तारीख, ह्या दिवशीं झालें. आणि ते तीन वर्षांचे झाले न झाले तोंच त्यांचे तीर्थरूप निवर्तले. तेव्हां, त्यांच्या सगळ्या लालनपालनाचा भार त्यांची विधवा मातुश्री राधाबाई ह्यांजवर पडला, आणि वंशपरंपरेचा वैद्यकीचा धंदा चालविण्यास घरीं कोणी मनुष्य न राहिल्यामुळें, तोही एकदम बसला. अशी मोठी विपत्ति प्राप्त झाली. आणखी, त्यांत वडिलोपार्जित संपत्तीस कृष्ण जोशांनीं बरीच भर घातली होती, त्या सगळ्या संपत्तीविषयीं

आपसांत कलह माजले. त्या कलहांच्या पायीं त्यांची अतिशयित खराबी झाली, आणि राधाबाईस मोठें संकट येऊन पडलें. परंतु, त्या स्वभावतः मोठ्या देवभक्त आणि धीराच्या होत्या. आपण देवावर भार घातला असतां तो आपली कधीं उपेक्षा करणार नाहीं, अशी त्यांची पक्की निष्ठा होती, त्याच्या योगानें, त्यांस तें कांहीं जड वाटलें नाहीं. त्यांनीं मोठ्या कष्टानें गरीबीचे दिवस काढिले. आणि सगळा जीव आपल्या एकुलत्याएक मुलावर ठेवून, त्याला सांगून शिकवून, त्यालाही आपणांसारखीच गरीबी सहन करण्याची संवय लाविली. हें शिक्षण कांहीं सामान्य नव्हे. आपणास जें काय चांगलें येत असतें, तें आपल्या मुलांस शिकवावें—मग ती मोठी विद्या असो, मोठी कला असो किंवा मोठा गुण असो—हें व्रत राधाबाईनीं एकनिष्ठेनें उत्तम प्रकारें पाळिलें, आणि ह्याचें फल त्यांच्या चिरंजीवांस आमरण पुष्कळ उपयोगीं पडलें, असें ह्या चरित्रावरून स्पष्ट दिसून येऊन मोठा चमत्कार वाटतो. हेंच मातापितरांस फार लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हेंच राधाबाईनीं त्यांस जर द्रव्याचें गाठोडें दिलें असतें, तर तें त्यांस इतकें सुखदायक झालें नसतें. आणखी ह्या प्रसंगीं हेंही सांगितलें पाहिजे कीं, राधाबाईच्या ठायीं तरी असें सामर्थ्य येण्यास ह्या घराण्यांतला वंशपरंपरागत सदाचार कारण होता. हा त्यांचा सदाचार त्यांच्या चिरंजीवांस मिळाला. त्या सदाचारापासून त्यांस द्रव्यप्राप्ति

झाली, आणि त्या द्रव्याच्या साहाय्यानें ते लौकिक मिळवून आणि आपल्या जन्माचें सार्थक करून गेले आहेत. ह्यावरून द्रव्यसंग्रहापेक्षां सदाचाराची योग्यता किती मोठी आहे, हें सहज लक्षांत येतें. असो.

कोणाचेंही चरित्र ह्मटलें ह्मणजे तें इतिहासाचें एक अंग असतें. आणि इतिहास ह्मटला ह्मणजे, त्या काळच्या सर्व विषयांचें विवेचन असतें. त्यांत अमकें एक येत नाहीं असें नाहीं. तेव्हां, पन्नास पाऊणशें वर्षांमागें आमच्यांतल्या देवभोळ्या राधाबाईसारख्या बायकांच्या समजुतींत नवसांचें केवढें प्रस्थ होतें, त्याची हकीकत हा एक इतिहासच आहे. हे नवस त्यांनीं आपल्या एकुलत्या एक मुलाच्या संरक्षणाकरितां आणि कल्याणाकरितां करून फेडिले. त्यांपासून बोध फारसा न झाला, तरी, त्यांचा चमत्कार वाटल्यावांचून राहत नाहीं. त्या नवसांचें टिपण जोशी ह्यांच्या दप्तरांत सांपडलें आहे. त्यांतल्या कांहीं ठोकळ ठोकळ बाबी केवळ मासल्याकरितां येथें सादर करितों:—

१. जीवधनचे देवीस बाळपाळणा—चोळीपातळ व एक मोतीं.
२. वज्राईस ,, ,, ,,
३. कोळवणचे महालक्ष्मीस ,, ,, ,,
४. उत्सलादेवीस ,, ,, ,,
५. कुलस्वामिणीस ,, ,, ,,
६. कुलस्वामिणीस दीप एक, रुप्याचा देह, व रुप्याची गांठ.

७. गणेशचतुर्थीस वाद्यें लावून पूजा करणें, रुप्याचे अवयव करून वाहणें, व दंपत्यें जेवविणें.

८. मौन्यमाहात्म्यपूजा—रुप्याचा दीप, २५ दंपत्यें जेवविणें.

९. श्रीवाळकेश्वरास मुखवटा.

१०. श्रीकणकेश्वरास सुवर्णाचा नाग—१ रुप्याचे अवयव, व पांच ब्राह्मण जेवविणें.

११. पुळ्यांच्या गणपतीस रुप्याचें पोट, व २५ ब्राह्मण जेवविणें.

१२. जेजुरीचे खंडोबास सवा मण भंडार वाहणें.

१३. श्रीशुक्लेश्वरीं नारायणास (सुरतेजवळ) नागबळ, मुखवटा, व ५० ब्राह्मण जेवविणें.

१४. श्रीवाळकेश्वरीं नारायणनागबळ करावी.

१५. मुंबईच्या रोकड्या हनुमंतास रुप्याच्या मांड्या व पोट आणि सवा मण तेलाचा अभिषेक.

१६. मुलाचा व्रतबंध द्वारकेस करणें.

१७. श्रीवाळकेश्वरास सवामण पेढे, सवामण साखरचणे वांटावे, व १०० ब्राह्मण जेवविणें.

१८. श्रीगणपतिनिमित्त पांच पकानें करून १० ब्राह्मण जेवविणें.

१९. अनुष्ठानास दक्षिणेस रुपये १००, व साहित्यास ७५ मिळून १७५.

२०. ब्राह्मणांस दक्षिणा शंभर रुपये.

२१. श्रीहनुमंतास प्रदक्षिणा करविल्या, सौ. वेणूबाईकडून त्यास रु० २७.

२२. चांपूबाईस रु० १००.

हे सगळे नवस राधाबाईनीं मोठ्या अगत्यानें, आस्थेनें, आणि भक्तिभावानें फेडिले. तिळमात्र कमी पडूं दिलें नाहीं. ह्या नवसांच्या भोळसरपणाविषयीं कांहीं परधर्मी लोक हिंदूंची टवाळी करीत असतात, आणि ह्या प्रकारच्या नवसांस लांच ह्मणतात. पण, आमच्या भाविक लोकांच्या समजुतींविषयीं त्यांस अज्ञान असतें, ह्मणून ते असें ह्मणतात, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. देवास कांहीं कमी आहे, किंवा त्याला लालचावून आपलें कार्य करून घ्यावयाचें आहे, अशी त्यांची समजूत मुळींच नाहीं. भारतांत सांगितलें आहेः—

**आर्या.**

गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनास बाळक वळावा
सत्य प्रेमचि दावुनि सुज्ञें तो विश्वपाळ वळावा. १.
कपटादरें वळो पर पर परमेश्वर कसा वळेल हरी
कृष्णकृपामृतनिधिची अकपट विनताकडे वळे लहरी. २.

**मोरोपंत.**

हें आह्मां लोकांस कांहीं नवीन नाहीं.

देव सर्वसमर्थ, सर्वशक्तिमान आहे, त्याला कशाची अपेक्षा नाहीं, तोच उलटें आपल्या भक्तांस पाहिजे तें देतो, हें आमच्या भाविकांस ठाऊक नाहीं, असें नाहीं. तें सगळें

पूर्णपणें ठाऊक आहे. परंतु, नवसांचा परिपाठ जो आहे, तो उपकारदर्शक आहे, कृतज्ञतादर्शक आहे, भक्तिदर्शक आहे, प्रेमदर्शक आहे, ह्मणून तो भाविक जन पाळितात. ह्मणजे, लहान वर्ष दोन वर्षांच्या मुलाच्या हातांत बापानेंच पेढा द्यावा, आणि तो परत मागितल्यावर मुलानें परत दिला ह्मणजे त्याला फार कौतुक वाटावें, आनंद व्हावा, आपणावर मुलाचा लोभ आहे असें वाटावें, त्यांतलाच हा नवसांचा प्रकार आहे. बाकी, गरीब बिचारा माणूस देवाला काय देणार, आणि देवाच्या काय उपयोगीं पडणार! श्रीकृष्णानीं एकदा अर्जुनास ह्या संबंधानें सांगितलें:—

श्लोक.

खरारा खगेंद्रासि माझ्या कराया
न कोणी मला पाहिजे लोकराया
न लागे तया घांस दाणा न पाणी
उभा जो पुढें नित्य जोडोनि पाणी. १.
लगामाविणें माझिया जो लगामीं
विना जीन वाहे मला व्योमगामी
अशा वाहना लागिं तो मानसाची
अपेक्षा नसे बुद्धि हे मानसाची. २.
ज्ञानांबरें स्वसुखकंचुकि जीस तीचीं
वस्त्रें पहा धुइल कोण रमे सतीचीं
कीं खेळवील उचलूनि मुला विधीतें
माझ्या करील जन हा कवण्या विधीतें. ३.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

असें आहे तरी,—

सकळ लौकिक वैदिक पांडवा
मज समर्पुनि तूं करिं तांडवा
करिसि होमिसि भक्षिसि देशि रे
मजमधेंचि समर्पित तें शिरे. ४.

वामनपंडित.

ह्मणून आमचें ह्मणणें असें आहे कीं, आमच्यांतल्या नवसांच्या परिपाठाची निंदा करणें हे अगदीं अज्ञानमूलक आणि अयोग्य आहे. असो.

राधाबाईनीं लहानपणापासून हरिश्चंद्रबाबांस पुष्कळ नीतिबोध केला, आणि स्वतः सदाचरण करून जगांत कसें वागावें हें त्यांच्या मनांत बिंबविलें. त्यांत दोन गोष्टी मुख्य होत्या. एक ही कीं, परमेश्वर करतो तें सगळें चांगलेंच करितो, वाईट कधीं कांहीं करीत नाहीं असें पूर्णपणें समजून, जीं काय संकटें येतील, त्यांस धैर्य धरून शांतपणें मान्य व्हावें, असंतुष्ट होऊं नये. आणि दुसरी ही कीं, कधीं कोणाचें वाईट चिंतूं नये. आह्मांला असें वाटतें कीं, ह्या दोहोंत सगळी नीति आली आहे. ह्मणूनच, हीं दोन तत्त्वें धरून हरिश्चंद्र बाबा हे आपल्या सगळ्या व्यवहारांत वागत गेले, त्याच्या योगानें ते चांगले नीतिमान निपजले, त्यांचे सगळे मनोरथ परिपूर्ण झाले, आणि प्रपंच सुखमय झाला. ह्यांचें भविष्य, ह्यांच्या लहानपणच्या वर्तनावरून जगन्नाथ शंकर शेटनीं करून ठेविलें होतें. एके वेळीं ते ह्या मुलाकडे पा-

हून असें ह्मणाले होते कीं, "हा मुलगा खरोखर कृष्ण जोशांचा लौकिक संभाळील, आणि आपल्या जातींत मोठा पुढारी होईल." हरिश्चंद्रबाबांस जगन्नाथ शंकरशेट, आणि हरिश्चंद्रबाबांचे मामा चिंतामण गणेश जोशी हे वारंवार चांगली सल्लामसलत देत असत. त्यावरून हरिश्चंद्रबाबा अगदीं शेवटपर्यंत त्यांचे उपकार आठवीत असत.

हरिश्चंद्र जोशी ह्यांचें लग्न त्यांच्या दाहाव्या वर्षी झालें. त्यांच्या सुदैवानें त्यांना बायकोही त्यांच्या सारखीच सुशील मिळाली. तिचें नांव लक्ष्मीबाई. ती आपल्या पतीच्या अर्ध्या वचनांत राहात असे, आणि प्रपंचांतलीं सगळीं कामें यथायोग्य रीतीनें करीत असे. तेणेंकरून हरिश्चंद्रबाबांस प्रपंच फार सुखावह झाला.

आमच्यांत स्त्रीशिक्षणाचा अभाव असल्यामुळें अशा स्थितीमध्यें मुलांची विद्या हें आईला मोठें संकट होत असतें. स्वतः शिकवितां येत नाहीं, आणि दुसऱ्यांनीं काय शिकविलें आहे हें पाहतांही येत नाहीं. तेव्हां, देवावर भरंवसा ठेवून, त्या संबंधानें करवेल तेवढा उद्योग करायाचा—मुलांस चांगल्या गुरूच्या हाताखालीं द्यावयाचें आणि त्यांना रिकामें बसूं न देतां त्यांजकडून लिहिणें वाचणें करवायाचें—ह्याच्या पलीकडे आईकडून कांहीं होत नाहीं. पण निष्ठा असली, आणि परमेश्वराची कृपा असली ह्मणजे मुलें चांगलीं निपजण्यास तेवढें देखील बस होतें. हरिश्चंद्रबाबांस तसें झालें. त्यांना

शाळेंत घालून थोडेंसें मराठी शिकविल्यावर, हरिश्चंद्रबाबांस वैदिक ब्राह्मणांकडून थोडें ब्रह्मकर्म पढविलें. ह्मणजे संध्या, पूजा, वैश्वदेव, अथर्वशीर्ष इत्यादि सगळें शिकविलें. नंतर ते ख्रिस्ती लोकांच्या शाळेंत इंग्रजी शिकूं लागले. तेथें त्यांनीं पुष्कळ मेहेनत करून, त्या काळच्या रीतीप्रमाणें, चांगला अभ्यास केला. त्याविषयींची फारशी माहिती कोठें सांपडत नाहीं, ह्याचें वाईट वाटतें. इंग्लंड, जर्मनी इत्यादि विद्याचारसंपन्न राष्ट्रांत जे कोणी पुरुष आपल्या उद्योगाच्या बळावर लहानाचे मोठे होतात, ते स्वतःच आपलें जीवन-चरित्र लिहून ठेवितात. त्यांत आपल्या विद्योपक्रमाचें वर्णन बुद्ध्या विशेष रीतीनें करितात. तें अशाकरितां कीं, त्या अनुभवाचा उपयोग पुढच्या पिढ्यांच्या विद्यार्थ्यांस व्हावा. पुष्कळ लोकांची समजूत अशी आहे कीं, मनुष्यास स्वभाषेचें व्याकरण चांगलें येत असल्यावांचून त्याला चांगलें कधींच लिहितां यावयाचें नाहीं. परंतु, सध्याच्या अत्यंत नामांकित ग्रंथकारांतला अग्रगण्य ग्रंथकार, हर्बर्ट स्पेन्सर ह्यानें, आपल्या आठ दहा वर्षांतल्या वयांतल्या विद्याभ्यासाविषयीं स्वचरित्रांत असें ह्मटलें आहे कीं, "मला इंग्रजी मुळींच कधीं कोणीं शिकविलें नाहीं. इंग्रजी व्याकरणांतला मला एक शब्दही येत नव्हता. आणि निबंध कसा लिहावा, हें मला कधीं कोणीं सांगितलें नाहीं." पण चमत्कार असा आहे कीं, ह्याचे सगळे ग्रंथ उत्तम आहेत. ते

सर्वमान्य आहेत. त्यांची भाषा इतकी बिंचूक आणि शुद्ध आहे कीं, व्याकरणावर ग्रंथ लिहिण्यांत ज्यांचे जन्म गेले आहेत, त्यांना ह्यांच्या अर्धा इतकें—चतुर्थांशाइतकें चांगलें लिहितां येत नाहीं. ह्यावरून उघड झालें कीं, चांगला ग्रंथकार होण्यास व्याकरण आलें पाहिजेच असें नाहीं. चांगल्या ग्रंथकारांच्या भाषेचें अनुकरण मनापासून केलें, आणि आपलीं मनोगतें चांगलीं सिद्ध करून तीं स्पष्ट शब्दांनीं लिहिण्याची सवय लागली, ह्मणजे चांगला ग्रंथकार होतो. असें कांहीं लिहून ठेवण्याचा परिपाठ जर आमच्यांत असता, आणि ते लेख हरिश्चंद्रांच्या हातचे असते, तर, त्यांवरून कितीएक सूचना आमच्या सध्याच्या विद्यार्थी मंडळीस मिळाल्या असत्या. पण, तसा मुळीं परिपाठच नाहीं, त्यास उपाय नाहीं.

असा त्यांचा अभ्यास चालला होता, आणि त्यांस अठरावें वर्ष लागलें, इतक्यांत त्यांच्या मातुश्री त्यांस सोडून गेल्या. त्यामुळें त्यांचा सगळा आधार तुटला, आणि प्रपंचाचें सगळें ओझें ह्यांच्या आंगावर पडलें. तेव्हां अर्थात् निर्वाहार्थ त्यांस सरकारी नौकरी धरावी लागली. तींतच ह्यांची बहुतेक हयात गेली. तिचें कथन पुढच्या भागीं करूं.

पाने ९४

# भाग चवथा.

## राजसेवा.

मौनें मूक दिसे वदे तरि महा वाचा स्वपार्श्वीं फिरे
तेव्हां धीट तसा विवेकचि नसे कीं चालतां अंतरें
क्षांतीनें तरि भ्याड शांति न धरी तैं गांवढा यापरी
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं.

वामनपंडित.

मनुष्याला निर्वाहार्थ कांहींतरी धंदा करणें भाग पडतें. धंदे अनंत आहेत. त्यांत अनंत प्रकार आहेत. त्यांमध्यें उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे पर्याय आहेत. आणि त्या पर्यायांच्या अनुरोधानें त्या त्या धंद्यांतल्या माणसांची मानमान्यता लोकांत होत असते. त्यांत सेवा ह्मणजे चाकरी ह्या धंद्याची गणना कनिष्ठांत आहे. “उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ चाकरी,” अशी ह्मणच आहे. ही धंद्यांची किंमत ते शिकायास जे काय श्रम लागतात, जें काय शाहाणपण लागतें, आणि जो काय पैसा लागतो, त्यावरून बहुधा ठरत असते. आणि सेवा किंवा चाकरी ह्मटली, ह्मणजे त्या धंद्यास आधीं फारसें कांहीं संपादावें लागत नाहीं, असा पूर्वी समज होता. यजमान सांगेल तें करायाचें आणि देईल

[stamp, faded] ...वाचनालय, ...



तें घ्यायाचें, ह्याच्या पलीकडे त्यांत फारसें नाहीं असें वाटे. आणि पूर्वीच्या काळीं त्यांत शिकायाचें असें मुळींच कांहीं नव्हतें खरें. तेव्हां, वर सांगितलेल्या नियमानुसार ह्या धंद्याची गणना कनिष्ठांत व्हावी, हें साहजिक होतें.

त्यांतही, सरकारी नौकरी ह्मटली ह्मणजे, फारतर थोडें बहुत शिकल्यानें मिळत असते. आणि तींत मनुष्य पडल्यावर त्याचा अनुभव आपोआप वाढून, अभ्यासाची विशेष मेहनत न पडतां, त्याची योग्यता वाढत असते. असें पुष्कळांचें होतें, आणि इंग्लिश राज्याचा अंमल कोंवळा होता, तेव्हां असें फार होत असे. तसें आमच्या चरित्रनायकांचें झालें. थोडासा अभ्यास झाला न झाला तोंच हरिश्चंद्रबाबा ह्यांस नौकरी पतकरावी लागली. ती त्यांनीं इ० स० १८५१ ह्या वर्षीं, सरकारच्या कष्टम खात्यांत, वीस रुपये दरमहाची मिळविली. हें सरकारी नौकरीचें तरी थोडेंसें जन्म घेण्यासारखेंच असतें. ह्मणजे त्यांत माणसास आपली इच्छा धरून चालतां येत नाहीं. योग येतात त्यांच्या स्वाधीन व्हावें लागतें. ह्मणजे वेळेस जी चाकरी मिळेल ती पतकरावी लागते.

हरिश्चंद्रबाबांच्या चाकरीस वीस रुपये दरमहावर आरंभ झाला, हें वर सांगितलेंच आहे. त्यांना प्रथम प्रथम फार मागें रखडत राहावें लागलें. पहिल्या बारा वर्षांत त्यांना विसांचे अवघे पन्नास झाले. परंतु, पुढें त्यांची कर्तबगारी त्यांच्या वरिष्ठांच्या नजरेस येत जाऊन, ते भराभर चढत

चालले. त्यांस इ० स० १८६१ त शंभर रुपयांवर जूनियर अप्रेजर नेमिलें. इ० स० १८६७ त ते १५० रुपयांवर थर्ड अप्रेजर झाले. त्या जागेवर असतां, असिस्टंट कमिशनर मि. मॉरी साहेब ह्यांनीं २५० रुपयांची इनस्पेक्टर आफ् साल्टची खाराघोडा येथील जागा पतकरायास त्यांस सांगितली. त्याविषयीं त्यांनीं त्यांस असें लिहिलें कीं, "ही जागा जबाबदारीची आहे. ह्या जागेवर चांगलाच इमानी अंमलदार पाहिजे आणि तसे तुह्मी आहां. इंग्रजी चांगलें आलें पाहिजे तें तुह्मांला येत आहे. त्याप्रमाणेंच जपून लक्षपूर्वक काम करणारा मेहनती मनुष्य येथें पाहिजे आहे. हे सगळे गुण तुमचे ठायीं आहेत. तुह्मी ही जागा अवश्य पतकरावी. नाहीं ह्मणूं नये." एवढा आग्रह होता, तरी, मुंबई सोडून बाहेर जाणें हें आपणांस आणि आपल्या कुटुंबास फार त्रासदायक होईल, असें त्यांस वाटलें. ह्मणून, मोठ्या जागेवर नेमण्याच्या योजनेबद्दल त्या साहेबांचे फार फार आभार मानून, त्यांनीं ती नको ह्मटली. पुढें इ० स० १८७५ त ते २०० रुपयांवर सेकंड अप्रेजर झाले. तेथें त्यांनीं फार चांगलें काम केलें, असें सर टी. सी. होप साहेबाच्या नजरेस येऊन, त्या कामाच्या आणि जबाबदारीच्या मानानें त्यांना पगार मिळत होता तो पगार अगदीं थोडा, असें त्यांस वाटून, त्यांनीं त्यांचा पगार एकदम पांचशें रुपये करविला. दोनशेंचे एकदम पांचशें ह्मणजे ही सामान्य बढती नव्हे. आणि तीही पुनः त्याच जागेवर.

ह्मणून तिचें मोठें भूषण वाटतें. एवढी मोठी बढती सरकारी नौकरांस क्वचित् मिळते. ह्या पगारावर पुष्कळ दिवस चांगलें काम करून, आणि वारंवार आपल्या वरिष्ठांच्या तोंडचा धन्यवाद मिळवून, एकतीस वर्षे राजसेवा करून, हरिश्चंद्र-बाबा हे इ० स० १८८२ त पेनशन घेऊन मोकळे झाले, आणि विश्रांति घेण्यास घरीं राहिले.

येथें थोडक्यांत, अप्रेजरचें काम काय असतें, त्याची व्याप्ति केवढी असते, आणि त्यावर जबाबदारी केवढी राहाते, हें सांगणें बरें दिसतें. अप्रेजरचें काम ह्मटलें ह्मणजे देशांत जो माल बाहेरून येईल किंवा देशांतून जो माल बाहेर जाईल, त्यावर सरकारच्या कायद्यांप्रमाणें आणि नियमांप्रमाणें जकात आकारणें हें होय. ह्या व्यवहारांत व्यापारी लोक जकात कमी आकारली जाण्याकरितां नानाप्रकारचे कावे करतात, आणि युक्ति लढवितात, आणि त्यांच्या योगानें सरकारचें नुकसान होतें. ही लबाडी बाहेर काढणें अप्रेजरचें काम असतें. हें फार नाजूक आणि फार अडचणीचें आहे. शिवाय, अप्रेजर कांहीं जन्मतःच जवाहिऱ्ये, किंवा कापडाचा व्यापार करणारे नसतात. त्यांना तो अनुभव काम करितां करितां आलेला असतो. तेव्हां कदाचित् एकाद्याला जवाहिरावरचा अप्रेजरपणा करितां येईल, पण कापडावरचा यावयाचा नाहीं, असा संभव फार आहे. परंतु, फार दिवसांच्या अनुभवानें आणि दक्षतेनें हरिश्चंद्रबाबांस ती कोणतीच अडचण राहिली

नव्हती. ते त्या सगळ्या कामांत प्रवीण झाले होते. त्याच्या योगानें त्यांस पाहिजे त्या खात्यांत काम करितां येत असे. अशीं माणसें तिकडे थोडीं निपजतात.

पण अशीं जीं माणसें हें काम मनापासून करतात, तीं त्यानें अगदीं दमून जातात. हरिश्चंद्रबाबांस, राजीनामा दिल्यावर, लागलेंच एका मोठ्या युरोपियन दुकानांत सातशें रुपयांवर सेल्समनच्या जागेवर मोठ्या आग्रहानें बोलावीत होते. पण, ते गेले नाहींत. कां कीं, तेव्हां ते काम करून करून अगदीं थकून गेले होते. तरी, ईश्वरी सूत्र कांहीं वेगळें होतें. त्यांचा राजसेवाधर्म संपला नव्हता. तो पुनः उलटला होता. तो आतां सांगतों.

इंग्रज सरकारच्या दप्तरांत नौकरीचा एकंदर इतिहास धुंडाळून पाहिला, तर, पेनशन घेऊन घरीं जाऊन बारा वर्षेंपर्यंत बसलेल्या नौकरास त्यांनीं आपण होऊन आर्जवानें परत कामावर बोलाविलें आहे, आणि, हिंदुस्थान सरकाराची विशेष मंजुरी आणून, पहिलें पेनशन चालू ठेवून, त्याच्या दुप्पट आणखी पगार दिला आहे, असें उदाहरण एतद्देशीयांत हरिश्चंद्र कृष्ण जोशांशिवाय दुसरें क्वचितच सांपडेल. ह्यांनीं इ० स० १८८२ त नौकरी सोडून पेनशन घेतल्याचें वर सांगितलेंच आहे. त्यानंतर बारा वर्षांनीं, ह्मणजे, इ० स० १८९४ त, आयात मालावर जकात घेण्याचा नवा कायदा चालू झाला, तेव्हां वस्तूंच्या किमती ठरविण्याच्या कामांत फार गोंधळ पडेल, नव्या माणसांच्यानें तें काम बरो-

वर व्हावयाचें नाहीं, कदाचित सरकारचें नुकसान होईल, किंवा कदाचित व्यापाऱ्यांवर जुलूम होऊन बोभाट होईल, आणि पुनः त्यावर अपील नसल्यामुळें लोकांत असंतुष्टि उत्पन्न होईल, अशी मोठी धास्ती कष्टमखात्यास पडली. त्यावेळीं कष्टम कमिशनर सर जेम्स क्यांबेल होते. त्यांनीं, व्हैसरायांच्या कौंसलाचे मेंबर नामदार ट्रेव्हरसाहेब ह्यांच्या सूचनेवरून, हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांस मोठ्या आग्रहानें पुनः नौकरीवर बोलाविलें. तेव्हां ते ६८ वर्षांचे होते, आणि त्यांच्या मनांत पुनः ताबेदारीचें जूं मानेवर घ्यावयाचें मुळींच नव्हतें. परंतु, सरकारचें अन्न त्यांनीं इतकीं वर्षें खाल्लें होतें, तें त्याच्या मुखावाटे नकार येऊं देईना. ते, सरकारच्या सूचनेप्रमाणें, कामावर रुजू झाले. तेव्हां एकाच वर्षाचा करार होता. परंतु, कामाच्या वहिवाटीची पुरती व्यवस्था लागली नव्हती. त्याकरितां त्यांस सरकारानें आणखीही पुढें राहून घेतलें. त्या मुदतींत, वयपरत्वें, त्यांची प्रकृति बरी नव्हती, आणि त्यांस त्या कामानें फार ताण पडत असे. तरी, ते मोठे कर्तव्यदक्ष होते. काम ह्मणजे काम, मग प्रकृति वगैरे कांहीं पाहायाचें नाहीं, असा त्यांचा पाठ पहिल्यापासून होता. तदनुरूप त्यांनीं हातीं घेतलेलें काम उत्तम प्रकारें करून, सरकाराकडून धन्यवाद पुनः मिळवून घेऊन, इ० स० १८९७ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस नौकरी शेवटची सोडिली. तेव्हां त्यांचें वय ७१ वर्षांचें होतें.

ह्या वेळची एक विशेष गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं, सगळीच नौकरी ह्मटली ह्मणजे, सांगेल तें काम करायाचें आणि देईल तो पगार घ्यावयाचा, अशी नसते. तींत अनुभवाची किंमत फार मोठी असते. हरिश्चंद्रबाबांस सरकारानें पुनः नौकरीवर बोलावून नेलें, तें एवढ्याचकरितां कीं, त्यांनीं त्या कामांतला जो अनुभव आलेला होता, तो दुसऱ्या कोणाच्याही ठायीं सांपडावयाचाच नाहीं, हें त्यांस ठाऊक होतें. आणि अनुभव ही जी चीज आहे, ती कांहीं बाजारांत विकत मिळत नाहीं. अथवा, दाहा दाहा वर्षांच्या अनुभवाचे पांच नौकर एका कामावर लाविले, तर, त्यांच्या हातून पन्नास वर्षांच्या अनुभवी माणसाचें काम व्हावयाचें नाहीं. आणखी आमच्या राज्यकर्त्यांसही ह्या गोष्टीवरून असें कळावें कीं, अशा प्रकारचीं—ह्मणजे सरकार व एतद्देशीय लोक ह्यांच्या निकट संबंधाचीं—जीं कामें आहेत, तीं हरिश्चंद्रबाबांसारख्या अनुभवी आणि चतुर एतद्देशीय पुरुषांकडून जशीं बिनबोभाट आणि सुरळीत होतील, तशीं इतर कोणाकडूनही व्हावयाचीं नाहींत. आणखी अशीं कामें सरकारांत पुष्कळ आहेत कीं, तीं बिनबोभाट आणि चांगलीं होण्यास प्रजाजनांच्या समजुतीचें, वहिवाटीचें कल्पनांचें आणि भावनांचें ज्ञान फार आवश्यक असतें. तें कांहीं केल्या परकीयांस प्राप्त होत नसतें. फार काय सांगावें, मेझर क्यांडीसाहेबांनीं मराठी भाषा शिकण्यांत चाळीस वर्षें घालविलीं, तरी,

ती त्यांस चांगली आली नाहीं. मग इतर व्यवहारांची गोष्ट एकीकडेस असो. कितीएक थोर विचारशील इंग्लिश महात्म्यांचें मत पर्यायेंकरून असें दिसतें कीं, लष्करासारख्या खात्यांत श्रेष्ठप्रतीच्या जागा एतद्देशीयांस देण्याचा परिपाठ असता, तर सत्तावन सालच्या बंडासारखे बखेडे मुळींच झाले नसते. ह्मणूनच, मोठ्या हुद्यांच्या जाग्यावर आमच्यांतल्या लायक माणसांस नेमण्याविषयीं राष्ट्रीय सभा सरकारास कंठशोष कर करून सांगत असते. तें त्यांनीं ऐकावें.

ह्या सरकारी नौकरीवर अलीकडे—विशेषेंकरून विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या वेळेपासून—जो एक मोठा आक्षेप बसला आहे, त्याविषयीं दोन शब्द लिहिण्याचें ठिकाण हेंच आहे असें वाटतें. ह्या नौकरीस कोणी बंदिशाळा, सोन्याची बिडी, रुपेरी बिडी अशीं नांवें ठेवून असें दर्शवितात कीं, मनुष्य सरकारी नौकरींत पडला ह्मणजे तो अगदीं फुकट गेला, त्याच्या हातून देशहित किंवा सार्वजनिक हिताचें कार्य तिळभरही व्हावयाचें नाहीं. पण, हें ह्मणणें सर्वांशीं बरोबर नाहीं. जो माणूस जेवीत असतो, त्या माणसास ईश्वरभक्ति करतां यावयाची नाहीं, ह्या ह्मणण्यासारखें हें ह्मणणें आहे. तोडरमल, नाना फडणीस, सर सालरजंग, सर दिनकरराव, सर टी. माधवराव, जंगबहादूर, आर. रघुनाथराव, शेषय्याशास्त्री, कृष्णमूर्ति, इत्यादि आमच्या मंडळीनें राजसेवा पतकरली ह्मणूनच त्यांना स्वदेशहित पुष्कळ साधितां आलें, एरव्हीं तें साधतां आलें नसतें. तीच

गोष्ट ग्लाडस्टन, लार्ड साल्सबरी, लार्ड बीकान्सफील्ड, प्रिन्स बिस्मार्क, जार्ज वाशिंग्टन, एब्राहाम लिंकन, इत्यादि परकीय राज्यकार्यधुरंधरांस लागू आहे. स्वदेशहिताचे मार्ग अनेक आहेत. त्यांतच, लोकांचा पैसा विनाकारण खरचूं नये, फुकट जाऊं नये, आणि सरकारचीं कामें कोणाचेंही नुकसान न होतां बिनबोभाट चालावीं असें करणें हा एक मार्ग आहे. ह्या मार्गानें हरिश्चंद्रबाबांस आपल्या देशांतल्या व्यापाऱ्यांचें पुष्कळ हित करतां आलें असलें पाहिजे. सरकाराची मर्जी संपादण्यास त्यांनीं मालाच्या किंमती अवाच्यासवा करण्याचा जर क्रम धरिला असता, तर जकात पुष्कळ अधिक आकारली असती, आणि तितकें लोकांचें नुकसान झालें असतें. तें त्यांनीं होऊं दिलें नाहीं. हें कांहीं थोडें नाहीं. न्या. रानड्यांविषयींही अशी एक आख्यायिका सांगतात कीं, अर्ज लेखी किंवा तोंडी कोणत्याही रीतीनें केले असतां एकसारखे कायदेशीर आहेत, ते अर्ज, लेखी न करितां तोंडी करण्याविषयीं ते पक्षकारांस आणि वकिलांस मोठ्या आग्रहानें सांगत असत. ह्यांतला हेतु एवढाच कीं, लेखी अर्जास जो छापी कागद लागावयाचा, त्याची किंमत गरीब रयतेच्या पिशवींत राहावी, सरकारच्या तिजोरींत येऊन पडूं नये. ह्या त्यांच्या नित्याच्या पद्धतीनें गरीबगुरीबांचे हजारों रुपये वांचले असतील, असें एका चतुर गणिती वकीलाचें अनुमान आहे.

आणखी आपल्या देशांतल्या सध्याच्या राज्यव्यवस्थेंत

असें आहे कीं, रयतेच्या उपयोगीं पडणें किंवा रयतेला सुख देणें हें, एकंदरीनें, जितकें मोठ्या अधिकाऱ्यांच्या हातीं आहे, तितकें किंवा कदाचित् त्याहून थोडें अधिकच लहान कामदारांच्या हातीं आहे. जर कधीं कोणाला वजन करितां आलें, तर, न्यायानें वागणाऱ्या सब्‌जज्जाच्या हातून झालेल्या लोकहितापेक्षां, न्यायानें वागणाऱ्या त्याच्या हाताखालच्या बेलिफाच्या हातून अधिक लोकहित झालें आहे, असें आढळून येईल. माजिस्त्रेटांच्यापेक्षां पोलिसाच्या हातीं लोकहित अधिक आहे. कागदावर न्याय लिहिण्यापेक्षां तो न्याय प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्यांत लोकसुख अधिक आहे. आणखी खालच्या दरजाच्या जागा ह्मटल्या ह्मणजे आपणा काळ्या लोकांच्या वांटणीस येतात, त्यांवर गोरेलोक कोणी येत नाहींत. शिवाय, सामान्यतः कोणत्याही खात्यांत मोठ्या जागांपेक्षां लहान जागा पुष्कळ असून, ठराव लिहिण्यापेक्षां अमलबजावणीचें काम पुष्कळ असतें, व लोकांचा मुख्य संबंध काय तो त्याशींच असतो. तेव्हां, सरकारी नौकरी पतकरल्यानें मनुष्य स्वराष्ट्रहितास उपयोगीं नाहींसा होतो, ही मोठी भ्रांति आहे. ह्याची साक्ष सगळ्या खात्यांतले सुशिक्षित आणि चतुर अधिकारी प्रांजलपणें देतील. ह्मणून सांगावयाचें मिळून एवढेंच कीं, देशहित करायाच्या निमित्तानें सरकारी नौकरी सोडणें किंवा सरकारी नौकरीस न शिवणें हें व्यर्थ सोंवळेपण आहे.

दुसरा एक विचार असा आहे कीं, आपल्या देशांतल्या सरकारी नौकरांस जो पगार मिळतो, तो सगळा पैसा आपल्या देशांतला असतो. कोणीं बाहेरून आणलेला नसतो. तेव्हां, त्यावर स्वत्व इंतरांपेक्षां आमच्या लोकांचें अधिक असतें. तो पैसा आह्मीं घेऊन आपल्या देशाची सेवा करण्यास काय ह्मणून संकोच करावा ? आपल्या घरच्या शेतांत मेहेनत करून त्यांतलें धान्य आपण घ्यावें, त्यासारखें हें आहे. ह्मणजे, एके प्रकारीं, आपण आपल्या प्रपंचाचीं खासगी कामें करितों, आणि त्याचें वाजवी फल मिळवितों, त्याप्रमाणेंच आपल्या देशाचें काम करून त्याबदल पगार घेणें आहे. तो पगार कोणाच्या हातून येतो, हें पाहाणें नाहीं. तो योगायोग आहे. पण, तो पैसा दुसऱ्याच्या मालकीचा नाहीं, आपला आहे, हें त्यांत विशेष आहे. ह्मणून त्याविषयीं काडीमात्रही कुकल्पना मनांत आणण्याचें प्रयोजन नाहीं.

शिवाय, स्वदेशहित करणें ह्याचा अर्थ कोणत्यातरी पर्यायानें, नीतीस अनुसरून, आपल्या देशांतल्या लोकांस, करवेल तेव्हां, करवेल तेथें आणि करवेल तितकें साह्य करणें असा आहे. हा मनांत आणिला ह्मणजे, अशा प्रकारचें देशहित, एकाद्या अगदीं थोड्या पगाराच्या सरकारी कामदारास जें करितां येतें, तें, एकंदरीनें, एकाद्या मोठ्या धनाढ्य सावकारासही करतां यावयाचें नाहीं, असें हिशेबानें दिसून येईल. हें जर खरें आहे, तर स्वदेशहितसंबंधानें सरकारी नौकरीवर

रिकामा कटाक्ष कां ठेवावा, तें समजत नाहीं. ह्यावर कोणाचें ह्मणणें असें पडतें कीं, सरकारी नौकरीनें स्वातंत्र्य जातें, आपलें खरें मत प्रगट करितां येत नाहीं, आणि मनास योग्य वाटतें तसें बेधडक वागतां येत नाहीं; हें स्वदेशहिताच्या उद्योगास घातुक आहे. ह्या संबंधानें आमच्या एका चांगल्या सुशिक्षित विचारी मित्रानें, मन मोकळें करून, बोलतां बोलतां आह्मांस स्पष्ट सांगितलें कीं, "मी सरकारी नौकर होतों, तेव्हां मला काय तें माझ्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याचें मन धरायाचें होतें. त्याला न रुचेल तें बोलावयाचें नाहीं, आणि त्याला न आवडेल तें करावयाचें नाहीं, एवढ्याविषयीं फार जपावें लागत असे, आणि हें आपल्या पारतंत्र्याचें पाप आहे, असें वारंवार माझ्या मनांत येत असे. परंतु, आतां, वकील झाल्यावर तो माझा सगळा भ्रम गेला आहे. सरकारी नौकरींत मला यजमान एक होता. आतां ह्या वकीलींत, न्यायाधीश हे तर अंशतः एक किंवा पाऊण किंवा निदान अर्धे तरी यजमान असून, जे शेंपन्नास पक्षकार मला काम देतात, ते सगळे माझे यजमान झालेले आहेत. मला त्यांचें मन धरावें लागतें, आणि त्यांस रुचत नाहीं तें सोडून, त्यांस पसंत असतें तें करावें लागतें. ह्मणजे, वास्तविक पाहिलें असतां, सरकारी नौकरीपेक्षां वकीलींत पारतंत्र्य फार आहे. हें मी खातरीनें सांगतों. आतां, ह्या वकीलीमध्यें, कारणपरत्वें, जीभ थोडीशी लांबवितां येते. अद्वातद्वा पुष्कळ बडबड

करितां येते, आणि एकादे वेळीं एकाद्या मोठ्या माणसालाही चांगलें झणझणीत उत्तर देतां येतें. पण, त्यांत कांहीं देशहित नसतें. नुसता वाचाळपणा असतो, आणि तेवढ्यावरूनच कांहीं अजाण लोक त्याची स्तुति करितात. ती आवडेल त्याला आवडो; मला कांहीं आवडत नाहीं, हें मी खरें सांगतों." ह्या बोलण्यांत पुष्कळ अर्थ आहे, आणि कितीएक शंकांचें निरसनही गर्भित आहे. ह्मणून ह्याचा सर्वांनीं चांगला विचार करावा.

---

## भाग पांचवा.

### गुणगौरव.

अंगीं जरि गुण असती प्रसिद्धि त्यांची तरी अपाप घडे
कस्तूरीचा परिमळ कळवाया शपथ वाहणें न पडे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

गुण नसतां जिणें व्यर्थ प्राणिमात्राचें

रामदास.

इहलोकीं सद्गुण हेंच खरें सुख आहे.

पोप.

कोणता देश घ्या आणि कोणता काल घ्या, त्यांत गुणांची चाहा असावयाची. सद्गुणांची निंदा करणारा माणूस कोठें सांपडावयाचा नाहीं. ज्यांचे ठायीं चांगले गुण मुळींच नसतात, किंबहुना जे दुर्गुणांचे प्र-

त्यक्ष पुतळे असतात, ते देखील सद्गुणांची स्तुतिच करितात. ह्याचें तात्पर्यच असें आहे कीं, सद्गुण आणि गौरव ह्यांची तुटातुट कोणास करितां येत नाहीं. सद्गुण शत्रूमध्यें असेना, त्याचा गौरव करणें भाग पडतें. मग इतरांच्या अथवा आपल्या ममतेच्या अथवा लोभांतल्या माणसांच्या आंगच्या गुणांचें वर्णन थोर पुरुष करतात, ह्यांत कांहीं विशेष नाहीं. आमचे चरित्रनायक हरिश्चंद्रबाबा जोशी ह्यांविषयीं कोणकोणत्या थोर पुरुषांनीं काय काय ह्मटलें आहे, ह्याचें थोडेंसें कथन करणें हें ह्या जागीं प्रशस्त वाटतें. त्यांत, प्रथमतः, त्यांच्या अंगीं कोणते विशेष गुण होते, ते थोडक्यांत सांगून मग त्यास आरंभ करावा, हें बरें दिसतें.

१. ज्या नानाप्रकारच्या पदार्थांवर त्यांस जकातीची आकारणी करावी लागत असे, त्या पदार्थांविषयीं चौकशी फार बारकाईनें, धिमेपणानें, आणि मोठ्या कळकळीनें ते करीत असत.

२. जकातींच्या नियमांची अमलबजावणी करतांना, लोकांशीं घांसाघांशी जितकी कमी होईल, तितकी कमी करण्याविषयीं ते आपली पराकाष्ठा करीत असत.

३. व्यापारी लोकांशीं अगदीं सरळ रीतीनें वागून, त्यांचा आणि आपला स्नेहभाव अढळ राहील, अशी सावधगिरी ते ठेवीत असत.

४. व्यापारी मंडळांत आपलें वजन उत्तम प्रकारें ठेवून, तद्द्वारा ते व्यापारासंबंधीं फार खोल माहिती कोणास न दुख-

वितां मिळवीत असत, आणि तिचा उपयोग व्यापारी आणि सरकार ह्यांचा समेट राही अशा रीतीनें करीत असत.

५. त्यांना अनुभव पुष्कळ आला होता, त्याच्या योगानें त्यांस बाजारच्या वस्तूंच्या किंमती बरोबर करितां येत असत, आणि त्याविषयीं तक्रार करण्यास कोणाला जागा नसे.

६. ते अत्यंत निस्पृह होते. आपलें सगळें काम अगदीं इमानेंइतबारें करीत असत. त्यांत कधीं लोभास वश झाले नाहींत. तेणेंकरून लोक संतुष्ट असत.

हे गुण कांहीं सामान्य नाहींत, फार मोठे आहेत. तेव्हां, ह्यांचें काम ह्यांच्या वरिष्ठांस नेहमीं पसंत पडत गेलें, आणि ह्यांस धन्यवाद मिळत गेला, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. दिव्याच्या बरोबर प्रकाश किंवा गुळाच्या बरोबर गोडी आलीच पाहिजे, त्याप्रमाणें सद्गुणांबरोबर संतोष आणि स्तुति आलीच पाहिजे.

हरिश्चंद्रबाबा जोशांनीं सरकारी काम उत्तम केलें, ह्याचें मोठें एक प्रमाण हें आहे कीं, बारा वर्षांनतंर, त्यांस सरकारानें परत कामावर बोलाविलें. आणि पहिलें पेन्शन चालू ठेवून त्याच्या दुप्पट पगार त्यांस दिला. शिवाय, त्यांच्या प्रामाणिकपणाविषयीं, दक्षतेविषयीं, हुशारीविषयीं, आणि सभ्यतेविषयीं त्यांचे अधिकारी सर चार्लस प्रिचर्ड, मि. डब्ल्यु. आर. प्राट, ऐ. सी. एस, नामदार मि. डब्ल्यु. लाक्, ऐ. सी. एस. सर ए विंगेट, ऐ. सी. एस, सर जेम्स

... ग्रंथालय, ...



क्यांबेल, के. सी. ऐ. ई, नामदार डा. जान पोलन, बी. ए. एल. एल. डी, ऐ. सी. एस्, आणि मि. आर. एम. केनेडी, एम. ए; ऐ. सी. एस्, इत्यादि थोर गृहस्थांनीं कितीएक वेळां ह्यांची शिफारस सरकारांत केली आहे. ते लेख साद्यंत येथें देण्यास अवकाश नाहीं. तरी, त्यांतले कांहींचे थोडथोडे उतोर मासल्याकरितां देतों:–

**नामदार डब्ल्यु. डब्ल्यु. लाक्** ह्यांनीं ह्मटलें आहे:–"मि. हरिश्चंद्र कृष्ण जोशी हे चांगले कसलेले अप्रेजर आहेत, ह्यांची मदत फार उपयोगीं पडली आहे."

**नामदार सर जेम्स क्यांबेल** ह्यांनीं लिहिलें आहे:– "फारशा भानगडी आणि कटकटी न होतां सुती कापडावरचीं जकात अगदीं सहज रीतीनें वसूल झाली, ह्यास मुख्य मोठी मदत ह्मटली ह्मणजे मि. हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांची होय. हे, सरकाराशीं एकनिष्ठेनें वागून पुनः कामावर आले होते, हें त्यांस मोठें भूषण आहे."

**मि. आर. एम. केनेडी** ह्यांनीं लिहिलें आहे:–"कामदारांविषयीं लिहिणें संपविण्याच्या अगोदर मला असें कळवायाचें आहे कीं, दुसरे अप्रेजर, मि. हरिश्चंद्र कृष्ण जोशी हे इ० स० १८९७ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस आपलें काम सोडून पेनशन घेऊन गेले होते. त्यांस आयात मालावर पुनः जकात चालू केल्यावर, त्यांच्या घराहून परत बोलावून आणिलें. आणि ते ६७ वर्षांचे होऊन अ-

शक्त झाल्यामुळें जरी त्यांच्या मनांत हें ओझें माथां घ्यावयाचें नव्हतें, तरी त्यांनीं सरकारच्या बोलावण्यास नाहीं ह्मटलें नाहीं. आणखी कापडावरची जकात कांहीं एक गडबड न होतां सुरळीतपणें वसूल झाली, हें सगळें त्यांच्या परिश्रमांचें फळ आहे."

हरिश्चंद्रबाबांस सरकारानें मोठ्या संतोषानें, त्यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल **रावबहादुर** ही पदवी दिली. तिजबद्दलची सनद त्यांस अर्पण करण्याचा दरबार इ० स० १९०० ह्या वर्षीं डा. पोलन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरला होता. त्या वेळीं त्यांनीं आपल्या भाषणांत ह्मटलें:—"अशा पदव्या देतात, तेव्हां त्यांविषयीं कोणी कोणी असें विचारितात कीं, असें पदवी देण्यासारखें मोठें काम ह्यांनीं कोणतें केलें आहे? पण, हा प्रश्न सध्याच्या समारंभाविषयीं कोणी विचारणार नाहीं, आणि कोणीं विचारिलाच, तर त्याला उत्तर देण्यास मुळींच अवकाश लागावयाचा नाहीं. कां कीं, मि. हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांनीं सरकारची नौकरी पुष्कळ वर्षेंपर्यंत मोठ्या इमानानें केली आहे, तिजबद्दल त्यांस ही पदवी देणें अगदीं योग्य आहे. मी ह्यांच्या नौकरीची हकीकत वाचिली. तिला आरंभ एकुणपन्नास वर्षांच्या मागें झालेला आहे. त्या वर्षांपैकीं एक एक मुदत बारा बारा वर्षांची धरून पाहिली तर असें दिसतें कीं, पहिल्या बारा वर्षांत ह्यांस, माझ्याप्रमाणेंच, बढती अगदीं मुंगीच्या पायांनीं

मिळाली. २० रुपयांवर आरंभ झाला, आणि बारा वर्षांनीं ५० झाले. पुढच्या बारा वर्षांत त्यांस पन्नासाचे दोनशें झाले. आणि त्यानंतर दोन वर्षांनीं ते ५०० रुपयांवर दुसरे अप्रेजर झाले. त्या जागेवर साहा वर्षें काम केल्यावर ते पेनशन घेऊन गेले. त्यांना बारा वर्षें विश्रांति मिळाली. तों इतक्यांत त्यांना पुनः महाराणीसरकारचें बोलावणें गेलें. आणि पेनशन घेऊन गेलेल्या शिपायांस जसें सरकारच्या आज्ञेवरून आणखी चाकरी करण्यास बोलावितात आणि ते मोठ्या उत्साहानें जसे चाकरीवर परत येतात, त्याप्रमाणें ह्यांसही आमंत्रण गेल्यावरून, राजाज्ञा शिरसावंद्य करून सर जेम्स क्यांबेल ह्यांच्या हुकुमाप्रमाणें ते आपल्या कामावर परत आले. तेथें त्यांच्या प्रामाणिकपणाचा, अनुभवाचा आणि एकनिष्ठेचा फार उपयोग झाला. ह्या प्रसंगीं ह्यांस ह्यांच्या कर्तव्यानें बोलावणें केलें, त्यास ह्यांच्यानें नाहीं ह्मणवलें नाहीं. आणि त्या जागीं त्यांनीं एकच वर्ष चाकरी केली नाहीं, तर, तीन वर्षांपेक्षांही अधिक मुदतीपर्यंत महाराणीसरकारचें काम करून, ते पुनः शेवटचें पेनशन घेऊन गेले. तेव्हां ह्यांचें वय ७० वर्षांचें होतें. सरकार आपल्या प्रामाणिक जुन्या नौकरांस विसरत नाहीं, आणि विसरलें नाहीं, हें पाहून हरिश्चंद्रांच्या अंतःकरणास आनंद होईल, आणि ह्या जुन्या नौकरांचा जो हा मोठा मान सरकारानें केला आहे, तो केवळ त्यांचा एकट्यांचा केला आहे असें नाहीं, तर त्यानें सगळ्या

कष्टम खात्याचा मोठा मान केला आहे, असें खात्यांतल्या सगळ्या माणसांस वाटणार आहे. आतां ही जी पदवी ह्यांस दिली आहे, हिच्या योगानें खात्यांत जे लोक सध्या कामावर आहेत, त्यांस चांगलें काम करण्याविषयीं उत्तेजन आलें पाहिजे. त्यावरून त्यांना असें समजलें पाहिजे कीं, दररोज जें कांहीं नित्याच्या वहिवाटीचें काम होतें, तें जर चांगलें प्रामाणिकपणानें आणि मनापासून केलें, तर ते श्रम कांहीं फुकट जात नाहींत, तर, शेवटीं केव्हांतरी त्यांचें बक्षीस मिळतें. आणि शांतपणानें आपलें काम चांगल्या रीतीनें जे करितात, त्यांना उतावीळ होण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांस त्यांच्या श्रमांचें फल खचीत खचीत मिळावयाचेंच असतें. सध्याही ह्या मोठ्या खात्यामध्यें कांहीं लोक मोठ्या मेहनतीनें आपलीं कामें अहोरात्र खपून चांगल्या प्रकारें इमानेंइतबारें करीत आहेत. त्यांनीं रावबहादुर हरिश्चंद्रांच्या अनुभवावरून कामाची हुरूप धरावी. आणखी, हें आमचें खातें ह्मणजे असें आहे कीं, जकात वसूल करण्याकरितां, जो कामदार अधिकाधिक मेहनतीनें आणि दक्षतेनें आपलें काम करितो, तितका तितका तो अधिकाधिक लोकांस अप्रिय व्हावयाचा, दुष्ट वाटावयाचा, असें असतां, रावबहादुरांनीं तें काम, कोणासही न जुमानितां, कायद्यांप्रमाणें अगदीं बरोबर करून हा मान मिळविला आहे, तेव्हां प्रामाणिकपणानें काम केल्याचें बक्षीस मिळण्याचा हा आरंभ आहे, असें मानिलें पाहिजे, आणि हें मोठें सुलक्षण आहे."

ह्याच प्रसंगीं मि. **एस. टी. भांडारे** बोलले:–"मी ह्या रावबहादुरांच्या हाताखालीं दोन तीन वर्षें [illegible] केलें आहे. आणि माझ्या अनुभवास असें आलें आहे [illegible] ह्यांस ह्यांच्या कामांत जें एवढें मोठें यश आलें आहे, त्यास मुख्य कारण ह्यांच्या आंगचा धिमेपणा आणि शांतवृत्ति हें होय. हे ह्यांचे गुण काम करीत असतां चांगले दिसून येतात. हे आमच्या खात्यांतल्या इतर कामदारांनीं रावबहादुरांच्या उदाहरणावरून घेतले पाहिजेत. हे नुसते मोठे उपयोगी सरकारी कामदारच नाहींत; तर, हे फार दयाळू आहेत. गरीबांवर उपकार हे फार करितात. हे चांगले वैद्य आहेत. आणि ह्यांच्यापाशीं रोग्यांत श्रीमंत आणि गरीब हा भेद नाहीं. हा बहुमान त्यांस ह्यातारपणांत मिळाला आहे. तरी त्यांची शरीरप्रकृति चांगली आहे; ह्या मानाचा उपभोग घेण्यास ते पुष्कळ वर्षें जगतील, अशी आह्मांस फार आशा आहे. ह्या समारंभासारख्या समारंभांनीं युरोपियन कामदार आणि त्यांच्या हाताखालचे एतद्देशीय लोक ह्यांचें प्रेम वृद्धिंगत होतें............ हे रावबहादुर जर इंग्लंडांत असते, तर ह्यांचा बहुमान ह्याहीपेक्षां पुष्कळ अधिक झाला असता."

ह्यावरून, कष्टम खात्यांतल्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय रावबहादुरांविषयीं कसे काय होते, ते दिसून येतात.

ह्या विषयाच्या संबंधानें सर्वांनीं एक गोष्ट विशेष लक्षांत ठवावयाची आहे. ती ही कीं, अशा प्रकारचे मानपान जे

आहेत, ते नारळाच्या फळासारखे आहेत. माड आज लावावा, आणि [illegible] उद्यां घ्यावा, असें कधीं व्हावयाचें नाहीं. त्यास कितीए[illegible]र्षें त्या झाडाची मशागत केली पाहिजे. ती मशागत करतांना जे कष्ट होतात, ते ज्याचे त्याला कळतात, ते पाहाण्यास लोक येत नाहींत. पण, ते ज्याचे त्यानें एकनिष्ठेनें मनापासून केले, ह्मणजे त्याला असें चांगलें फळ न मागतां आपोआप मिळतें—त्याच्या मागें लागतें—त्याच्या गळीं पडतें. अशीं उदाहरणें आहेत, त्यांवर विश्वास ठेविला पाहिजे.

---

# भाग साहावा.

## मानपान.

मानोपि महतां धनम्.

सुभाषित.

जगामध्यें अदृश्य परंतु अत्यंत, ग्राह्य अत्यंत्त मोलवान अशा ज्या कांहीं वस्तु आहेत, त्यांत मान मुख्य होय. वस्तुगत्या पाहिलें असतां त्याची कांहीं किंमत नाहीं, तो कांहीं विकत देतां घेतां येत नाहीं, असें जरी आहे, तरी, केवळ त्याच्या नांवाच्या प्रभावावर जगांत एवढीं देणींघेणीं चालतात कीं, तेवढीं देणींघेणीं दुसऱ्या कशानेंही चालत नाहींत. ह्मणूनच, मान हेंच थोरांचें

धन ह्मटलें आहे. आणि त्याकरिताच, चांगलीं माणसें प्रसंगीं सर्वस्व खराचिण्यास सिद्ध होतात. " योद्धा " ह्मणवून घेण्याच्या मानाकरितां शूर पुरुष जीवाकडेही पाहात नाहींत. पण, असे मान, मनुष्यानें आपलीं कर्तव्यें यथास्थितपणें केलीं, ह्मणजे त्यास देण्याविषयींची प्रवृत्ति लोकांत आपोआप होते. त्यांतला प्रकार ह्या चरित्रांत कसा काय झाला आहे, त्याचीं ठोकळ ठोकळ कांहीं उदाहरणें सांगतों.

१. हरिश्चंद्र बाबांस, इ० स० १८६४ ह्या वर्षीं मि. ई. प्राट ह्यांनीं, त्यांच्या प्रामाणिकपणाच्या गौरवार्थ, एक बहुमोल हिऱ्याची आंगठी दिली.

२. इ० स० १८८२ त ते प्रथम सरकारी चाकरी सोडून पेनशन घेऊन निघाले, तेव्हां, सरकारानें, त्यांच्या इमानदारीच्या नौकरीबद्दल, त्यांस एका वर्षाचा पगार, ह्मणजे ६००० रुपये बक्षीस ह्मणून दिले.

३. इ० स० १८९६ त त्यांस सरकारानें मुंबई शहरच्या **जस्टिस आफ् धि पीसची** पदवी दिली.

४. इ० स० १८९७ त, महाराणी व्हिक्टोरिआ ह्यांच्या डायमंडजुबिलीच्या उत्सवाच्या वेळीं त्यांस एक " सन्मानाची सनद " दिली. तिजवर, तेव्हांचे गव्हरनर साहेब लार्ड स्यांढर्स्ट ह्यांची सही आहे. तिचा आशय असा आहे:—" मि. हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांनीं सरकारची नौकरी, मोठ्या नेकीनें, शेंचाळीस वर्षेंपर्यंत केली. तिच्या

संस्मरणार्थ ही सनद, महाराणी व्हिक्टोरिया, हिंदुस्थानच्या बादशाहिणी, ह्यांच्या नांवानें, नामदार व्हाइसराय आणि गव्हरनर जनरल ह्यांच्या अनुज्ञेवरून मि. हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांस दिली असे."

५. इ० स० १९०० च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस हिंदुस्थानचे व्हाइसराय आणि गव्हरनर जनरल, लार्ड कर्झन ह्यांनीं ह्यांस, सन्मानाची **रावबहादुर** ही पदवी दिली.

६. त्याच वर्षाच्या एप्रिल महिन्यांत नामदार डा. पोलन ह्यांनीं, त्या खात्यांतल्या इतर कामदारांच्या वतीनें, त्यांस, प्रेमचिन्ह ह्मणून, कांहीं मोलवान नक्षीचीं चांदीचीं भांडीं बक्षीस दिलीं. त्या वेळीं त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, "मि. हरिश्चंद्र ह्यांनीं महाराणीसरकारची कामगिरी उत्तम प्रामाणिकपणानें बजावून, आपल्या जवळच्या कामदारमंडळीचें प्रेम फार चांगलें संपादिलें आहे, हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो."

७. इ० स० १९०३ ह्या वर्षीं त्यांस सरकारानें आनररी माजिस्त्रेट होतां का ह्मणून विचारिलें होतें. तें ह्यांनीं नाहीं ह्मणून सांगितलें. अशा मानाकरितां कितीएक लोक अगदीं हपापलेले असतात.

८. इ० स० १९०० ह्या वर्षीं श्रीशंकराचार्यांनीं मुंबईच्या हिंदू लोकांच्या सभेंत त्यांस एक आशीर्वादपत्र दिलें, त्यांत त्यांच्या आंगच्या गुणांचें वर्णन चांगलें केलें आहे. तें आशीर्वादपत्र येणेंप्रमाणें.—

॥ श्रीशङ्करो विजयतेतराम् ॥

शिक्षा.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यषड्दर्शनस्थापनाचार्य-तोटकाचार्यपरम्पराप्राप्तवैभव निखिलभूमण्डलाचार्य वैदिकमार्गप्रवर्त्तक सर्वतन्त्रस्वतन्त्रश्रीनगरमहास्थानराजधानी-विष्णुप्रयागतीरनिवास यमनियमाद्यष्टाङ्गयोगनिष्ठब्रह्मनिष्ठ-गुरुचरणकमलोपासनासञ्जातशुद्धान्तःकरणजगद्गुरु श्रीमदच्युतानन्दकरकमलसञ्जाताभिषेकसिंहासनाधिरूढ महाराजाधिराजश्री ज्योतिर्मठाधीश्वर श्रीमच्छङ्कराचार्य श्रीराजराजेश्वरानन्दगिरिस्वामिभिः प्रणीताः शुभाशीर्वादाः स्वस्थानं ज्योतिर्मठान्तर्गतधोलका साम्प्रतं मुम्बापुरे ।

स्वस्ति वेदशास्त्रसंपन्नाय श्रीमद्राजमान्यराजवैद्याय शुक्लयजुर्वेदीयमाध्यन्दिनीयशाखाध्यायिने द्विजोत्तमाय मुम्बारीभूषणाय श्रीमते जोश्युपाह्वकृष्णात्मजहरिश्चन्द्रशर्मणे सत्कर्मणे ( रावबहादुरपदवीधारिणे ) मुम्बापुरस्थाखिल-सज्जनानुमतेन सन्तोषेण च मद्धस्ततः समर्प्यते सहर्षमिदं सन्मानपत्रम्. चन्द्रमौलिर्भगवान् भवन्तं धर्मवन्तं दीर्घायुषं करोत्वित्याशास्यते.

रावबहादुर जोशि हरिश्चन्द्रः कृष्णात्मजो जयतु ॥
अधिकारिजनाभिमतो नीतिव्यवहारविन्नृपाराज्ये ॥ १ ॥

श्रौतस्मार्त्तवृषोन्नतीच्छुरखिलप्राणिभ्य इष्टप्रदः ।
सद्विद्यालतिकाभिषेचनविधौ पीयूषपाथोधरः ॥
गाम्भीर्यादिगुणैरिह स्वधिकृते राज्यें नृपाया जनै-
र्मान्यो भव्यगुणार्भको विजयतां श्रीमान्हरिश्चन्द्रसः ॥ २ ॥

रचयिता शास्त्रि हरिकृष्णशर्मा.

मिती संवत् १९५६ माघ शुक्ल ५ रवौ ।

ह्या सगळ्या गोष्टींवरून असें दिसून येईल कीं, हरिश्चंद्र-बाबांनीं जसें सरकाराकडून शाबास ह्मणून घेतलें, तसें लोकां-कडूनही धन्य ह्मणून घेतलें. ह्याचा अर्थ समजावयाचा कीं, "नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" ह्यांतले ते होते. ह्याच्या पलीकडे तें काय मिळवावयाचें !

---

# भाग सातवा.

## दानधर्म.

द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश
कीं दान भोग अथवा तिसरा विनाश
जो घे न भोग जरि पात्रकरीं न देही
त्याच्या धनास मग केवळ नाश पाहीं.

वामनपंडित.

"खरचणें हाच पैशाचा उपयोग आहे. तें खरचणें मात्र सत्कृत्यें आणि सन्मान ह्यांत झालें पाहिजे."

लार्ड बेकन.

पाने ९८
८८४७३
च ३०५

संपत्तीचा इतिहास पाहिला, तर, असें आढळून येईल कीं, पृथ्वीच्या पाठीवर तिच्या पायीं जशीं अगणित पातकें झालीं आहेत, तशीं तिच्या सद्व्ययानें अगणित पुण्येंही घडलीं आहेत. परमार्थाचा विचार क्षणभर एकीकडे असो. त्यानें पुण्य जोडतें आणि देव तुष्ट होतो, हें तर आहेच. पण प्रपंचसंबंधानें माणसांस आजपर्यंत जें काय सुख झालें आहे, त्यामध्यें द्रव्यापासून झालेल्या सुखाचा अंश फार मोठा आहे. आणि संपत्तीचा खरा उपयोग तोच आहे. त्यामध्यें एक पर्याय असा आहे कीं, त्यापासून उत्पन्न झालेलें सुख थोडक्या माणसांस आणि तेंही अल्पकालपर्यंत मिळतें. पण दुसरा श्रेष्ठ पर्याय असा आहे कीं, हा उपभोग एकदम होऊन न संपतां, तो पुष्कळ लोकांस बहुत कालपर्यंत घेतां येतो. हे दोन्ही पर्याय ज्यांस साधतात, ते खरोखर धनवान आणि पुण्यवान होत. त्यांतलेच हरिश्चंद्र कृष्ण जोशी हे एक होते. ह्यांनीं आपल्या वडिलोपार्जित मोठ्या संपत्तीस स्वपराक्रमानें चांगली भर घालून, तिचा व्यय प्रपंच आणि परमार्थ या दोहोंकडेही चांगला केला आहे. त्यांपैकीं, त्यांच्या दानधर्माच्या कांहीं गोष्टींचें कथन येथें करितों.

ह्यास आरंभ करण्यापूर्वीं ह्यांत हरिश्चंद्रबाबांची दूरदृष्टि जी व्यक्त होते, तिजविषयीं दोन शब्द बोलल्याशिवाय राहावत नाहीं. त्यांच्या दानधर्माच्या मुख्य शाखा दोन दिसतात,

एक दवाखाना, आणि दुसरी वेदादि धर्मग्रंथ पठणाच्या शाळा. ह्यांपैकीं, दवाखाना हा मनुष्याच्या देहाच्या विपत्तीस नाहींसें करून टाकण्यास योजिलेला होता, आणि पाठशाळा ह्या आत्मिक विपत्तीस नष्ट करून टाकण्यास योजिल्या होत्या. ह्मणजे, परमेश्वरानें मनुष्यास त्याच्या स्वतःच्या अशा ज्या दोन वस्तु—देह आणि आत्मा ह्या—दिल्या आहेत, आणि ज्यांच्या साह्यानें त्यास सगळें इहपर साधावयाचें असतें, त्यांस साह्य करण्यांत आपल्या संपत्तीचा विनियोग मोठ्या चातुर्यानें ह्यांनीं केला, हें कांहीं सामान्य नव्हे.

१. **दवाखाना**—हरिश्चंद्रबाबांचा दानधर्म मोठा होता, आणि त्यांचा लौकिक त्याविषयीं बहुत दिवसांपासून पुष्कळ झालेला आहे. तो आपोआप झाला आहे. त्यांनीं स्वतः त्याविषयीं कधीं गाजावाजा केला नाहीं. त्यांस गुप्तदान फार आवडत असे. लोकांच्या उपयोगीं पडावें, असा त्यांचा फार हेतु होता. त्याकरितां त्यांनीं घरीं धर्मार्थ दवाखाना ठेविला होता. तो ते स्वतः चालवीत असत. त्यानें त्यांस वडिलोपार्जित धंदा कायम ठेवून चालविल्याचें श्रेय मिळून, त्यांचे हातून लोकांवर फार उपकार होत. ते स्वतः रोग्यांच्या प्रकृति पाहून औषधें देत असत. पण कधीं कोणापासून त्याबद्दल पैसा घेत नसत. त्यांच्या हातून हजारों रोगी बरे होऊन गेले आहेत. त्यांत ते जातपात पाहात नसत. युरोपियन, हिंदु, मुसलमान, पारशी, इत्यादि सगळे लोक, कोणी श्रीमंत असोत कीं गरीब

असोत, हरिश्चंद्रबाबा सगळ्यांस एकसारख्या रीतीनें आणि एकसारख्या ममतेनें वागवीत असत. हा दवाखाना त्यांनीं पन्नास वर्षें चालविला. त्यांत त्यांचा पुष्कळ वेळ गेला आहे, त्यांना पुष्कळ श्रम पडले आहेत, आणि त्यांचा पुष्कळ पैसा खरचला आहे, तरी त्यांनीं त्याविषयीं कधीं तोंडाबाहेर अक्षर काढिलें नाहीं, कीं त्याचा डौल दाखविला नाहीं. तरी, त्यांस पुष्कळ गरीब लोक दुवा देत आहेत, आणि त्यांचा लौकिक पुष्कळ गाजत आहे. चौतीस वर्षें ते सरकारी नौकर होते. तरी, त्यांनीं त्या नौकरीच्या निमित्तानें दवाखान्याच्या कामांत कधींही खंड पडूं दिला नाहीं. त्यांच्या औषधानें बरीं झाल्यावर कितीएक माणसें, अत्यंत कृतज्ञतापूर्वक त्यांस कांहीं देणग्या आणि पैसे देण्यास तयार झालीं होतीं. परंतु त्यांनीं त्यांस हात देखील लाविला नाहीं.

त्यांच्या अंगीं वैद्यकीचा गुण त्यांच्या वडिलांच्यापेक्षां कदाचित अधिक नसेल, पण वडिलांच्या इतका होता, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांनीं वनस्पतिशास्त्राचा अभ्यास चांगला केला होता, आणि कांहीं कांहीं रोग बरे करण्यांत तर त्यांचा हातखंडा असे. ही गोष्ट डाक्टर डब्ल्यू. डीमाक व कै. डा. गोपाळ शिवराम सारखे मोठ मोठे धन्वंतरि प्रांजळपणें कबूल करीत असत. डा. डिमाक ह्यांनीं एक रोगी मूल औषधोपचारास त्यांजकडे पाठवून त्याविषयीं त्यांस असें लिहिलें कीं, "तुह्मी ह्या मुलास बरें कराल अशी माझी खातरी आहे."

स्थूल मानानें आकार करून पाहिला असतां एकंदर पंचावन वर्षांत दवाखानानिमित्त सुमारें १५००० रुपये त्यांचा खर्च झाला असावा असें दिसतें.

२. **राधाकृष्ण बाग**—आपल्या मातापितरांचें स्मारक ह्मणून दादर येथें ह्यांनीं ही इमारत बांधिली आहे. ही हिंदु लोकांच्या लग्नाकार्यांस फार उपयोगीं पडते. तेथें हीं दोन मोठीं घरें आहेत. त्यांच्या भोंवतीं पुष्कळ मोकळी जागा आहे. तेथें लग्नकार्यांत कुटुंबांस राहण्यास फार चांगली सोय होते. ह्या कृत्यास त्यांस १८००० रुपये लागले. ह्यानें हिंदुलोकांची एक मोठी अडचण दूर झाली आहे.

३. **राधाकृष्ण धर्मशाळा**—ही त्यांनीं आपल्या जातीच्या लोकांस क्रियाकर्मांतर करण्यास सोईची इमारत वाळकेश्वरीं बांधिली आहे. ही इमारत घेण्यास त्यांस ६००० रुपये लागले. हेंही मातापितरांचें स्मारक आहे, हें उघड आहे.

ह्याच प्रकारची एक लहानशी धर्मशाळा त्यांनीं ठाणें जिह्यांत केळवें माहीम येथें हिंदु लोकांतल्या उत्तरकार्याकरितां बांधिली आहे.

४ **राधाकृष्ण पाठशाळा.**—ह्यांस असें खचीत वाटत होतें कीं, वेदशास्त्रांच्या अभ्यासानें आपल्या मंडळीचें पुष्कळ चांगलें होईल. ह्मणून त्यांनीं वीस वर्षांमागें मुंबईस एक पाठशाळा स्थापिली होती, आणि ती सात वर्षेंपर्यंत आपल्या खर्चानें चालविली होती. पुढें रामचंद्र मोरेश्वर ऊर्फ बाबा

फाटक हे विद्वान गुरुजी निवर्तले, तेव्हां ती बंद पडली

इ० स० १९०३ त त्यांनीं, ठाणें जिल्ह्यांत चिंचणी येथें एक आणि केळवें माहीम येथें एक अशा दोन पाठशाळा स्थापिल्या, आणि त्या निरंतर चालाव्या अशी त्यांची तर्तूद करून ठेविली आहे. त्या संबंधानें मुंबईवैभवांत लिहिलें आहेः— "दोन वेदशाळा आपल्या खर्चानें स्थापन करून व त्यांस अशा रीतीनें उत्तेजन देऊन रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांनीं आपली उदारता, स्वज्ञातीसंबंधीं कळकळ, व गुणग्राहकता उत्तम रीतीनें व्यक्त केलेली आहे." खरें आहे.

ह्या शाळांत अभ्यास चालतो तो फार चांगला असतो, असें मत एलफिन्स्टन कालेजांतले प्रोफेसर पंडित नानू रामचंद्र भानु ह्यांसारख्या विद्वानांनीं प्रगट केलें आहे.

येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं, शिक्षणाच्या संबंधानें जरी ह्यांचीं मतें अशीं जुनीं होतीं, तरी, नवीन तऱ्हेचें इंग्लिश शिक्षण देण्याकरितां ज्या संस्था येथें काढिल्या आहेत, त्या संस्थांसही ह्यांनीं चांगला हातभार लाविला आहे.

ह्या ह्यांच्या सार्वजनिक कल्याणाच्या धर्मार्थ संस्था सांगितल्या. ह्यांशिवाय त्यांच्या खासगत धर्मादायाच्या संस्था पुष्कळ आहेत. त्यांनीं पुष्कळ देवदेव केला आहे, दानधर्म केला आहे, यात्रा केल्या आहेत, देवळांस देणग्या दिल्या आहेत, उपयुक्त संस्थांस वर्गण्या दिल्या आहेत, आणि गरीबगुरीबांस साह्य करण्याकरितां पुष्कळ पैसा खरचिला आहे.

मुंबईसारख्या नाना प्रकारच्या मोहांनीं भरलेल्या ठिकाणीं हातांत पुष्कळ पैसा असून, अशा प्रकारें सद्व्ययाची बुद्धि होणें हें केवळ पूर्वपुण्याईचें किंवा परमेश्वरी कृपेचें फल आहे. फार कोणी सांगता संवरता नसतां, त्यांची बुद्धि अमार्गाकडे वळली नाहीं, सन्मार्गास धरून राहिली, ह्याचें खरोखर मोठें नवल वाटतें. समर्थांनीं ह्मटलें आहेः—

ओव्या.

देव ब्राह्मणा आचार विचार कितीक जनास आधार
सदा घडे परोपकार देणें ईश्वराचें. १.
देवाचा कैं पक्ष घेणें ब्राह्मणांची चिंता करणें
बहुत जनांस पाळणें देणें ईश्वराचें. २.
उत्तम गुणांचा ग्राहिक तर्क तीक्ष्ण विवेक
धर्मस्थापना पुण्यश्लोक देणें ईश्वराचें. ३.

दासबोध.

ह्याची आठवण होते.

## भाग आठवा.

### अंतकाळ आणि स्वभाव.

सरतां संचिताचें विशेष नाहीं क्षणाचा अवकाश
भरतां भरतां निमेष जाणें लागे.

रामदास.

मागें मेले पुढेंहि मरतिल
कोण करील त्यांची गणती.

रामजोशी.

हरिश्चंद्र बाबांची मूळ प्रकृति चांगली निकोप आणि सुदृढ होती. आणि खाण्यापिण्यांत आणि आहारविहारांत ते अतिशयित नेमस्त होते. फार काय सांगावें, त्यांचीं इतकीं वर्षे कचेरींत गेलीं, पण तेथें कधीं ते पाणी देखील प्याले नाहींत. तेणेंकरून त्यांना फारशीं कधीं दुखणीं आलीं नाहींत. आणखी त्यांतही त्यांचें कुटुंबही त्यांस असें मिळालें होतें कीं, ती बाई त्यांच्या प्रकृतीस जीवापलीकडे जपत असे. परंतु, नेमानेमापुढें काय उपाय ! लहानपणापासून ते मोठे कष्टभागी होते. आणि परोपकारीं आपलें शरीर लागावें, असें नेहमीं त्यांस वाटत असे. त्यामुळें वृद्धापकालची मेहनत त्यांस सहन न होऊन मरायाच्या आधीं दोन वर्षे त्यांस मधुमेहाची विकृति जडली. आणि त्यांतच त्यांच्या मोठ्या कुटुंबांत कांहीं मृत्यु झाल्यामुळें त्यांच्या जीवास अनेक धक्के बसले. त्यांनीं क्षीण होऊन ते, थकत थकत जाऊन, पौष शुद्ध १० शके १८२७ गुरुवारीं, ह्मणजे, इ० स० १९०६ च्या जानेवारीच्या चवथ्या तारखेस, अत्यंत शांतपणें, एकाद्या मोठ्या साधूप्रमाणें मरण पावले.

आतां त्यांच्या स्वभावाविषयीं ह्मणजे वर्तनाविषयीं थोडें सांगायाचें आहे. वास्तविक पाहिलें असतां मनुष्याचीं कृत्यें हीं त्याच्या स्वभावाचीं फलें असतात. तेव्हां त्याच्या कृत्यां-

वरून त्याच्या स्वभावाचें अनुमान सहज होण्यासारखें असतें. त्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे हरिश्चंद्र बाबा ह्यांचें वर्तन निर्दोष आणि कित्ता घेण्यासारखें होतें. आणि आह्मांला असें वाटतें कीं, त्यांचें लहानपण लाडांत गेलें नाहीं, चांगल्या मातृशिक्षेंत गेलें, त्याचा तो सगळा परिणाम होता. आजपर्यंत जीं माणसें अशीं गरीबींत आणि सुशिक्षेच्या सांचांत लहानाचीं मोठीं झालेलीं आहेत, त्यांच्या चरित्रांत हा प्रकार स्पष्ट दिसून येतो. हरिश्चंद्र बाबा लहानपणापासून मोठे धर्मनिष्ठ होते. त्यांची राहाणी फार साधी होती. सगळ्या कामांत नेमस्तपणा पूर्णपणें वास करीत होता. प्रामाणिकपणा आणि भूतदया हीं त्यांचीं मुख्य व्रतें होतीं. सरकारच्या कचेरींत, दवाखान्यांत, घरांत किंवा इतर कोठें कितीही काम करायाचें असो, केवढाही तगादा असो, केवढीही घाई असो, त्यांच्या सकाळच्या आणि संध्याकाळच्या स्नानसंध्येंत किंवा देवदेवतार्चनांत कधीं तिळभरही अंतर पडलें नाहीं. आणि त्यानीं तें सगळें कर्म यथासांग झाल्याखेरीज कधीं अन्नसेवन केलें नाहीं. त्यांच्या वृत्तीच्या साधेपणाची अशी एक गोष्ट आहे कीं, त्यांस दीडशें रुपये पगार झाल्यावर, त्यांचे मित्र मि. राईट व मि. मेजर व्हेनली ह्यांनीं त्यांस बूट वापरण्याविषयीं कितीएक दिवस आग्रह चालविला होता. त्यास ते दाद देईनात, ह्मणून त्यांनीं त्यांचा जोडा फाडून टाकिला, आणि बूट आणायास सांगितला. परंतु, ते सगळे श्रम व्यर्थ गेले. हरि-

श्चंद्रजींनीं पुनः जोडाच आणविला. ह्यांतलें मुख्य बीज हें होतें कीं, त्यांना डामडौल अगदीं नको होता. तें पाहून त्यांच्या मित्रांस विलक्षण आश्चर्य वाटे.

त्याप्रमाणेंच त्यांचा प्रामाणिकपणा आणि सत्यशीलता हीं त्यांच्या खासगी आणि सरकारी कामांत उत्तम कसोटीस उतरलीं होतीं. आणि सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांविषयीं चांगलें लिहिलें, त्यांना बक्षिसें दिलीं, त्यांचा पगार वाढविला, आणि त्यांस पदव्या दिल्या, हीं त्याचींच प्रत्यक्ष प्रमाणें आहेत. त्याचप्रमाणें लहानमोठे अनेक लोक, आपल्या व्यवहारांतल्या विचारमसलती पुसण्यास ह्यांजकडे नेहमीं येत असत. ते ह्यांचें ऐकत असत, आणि ह्यांस भजत असत.

त्यांची निर्लोभता आणि आत्मसंयमन हीं त्यांच्या खासगत आणि सरकारी अशा दोन्ही प्रकारच्या कामांत दिसून आलीं. सरकारी कामांत ते लांचाला कधीं शिवले नाहींत. वरिष्ठ अधिकारी पदवी देण्याविषयीं ह्यांची शिफारस करायास तयार असतां, ह्यांनीं कितीएक वेळां नको ह्मटलें आहे, आणि पदव्या मिळाल्यावर त्या संबंधाचे समारंभ करण्यास मंडळी उत्सुक असतां त्यांनीं कितीएक वेळां नाकारिलें आहे, ह्यावरून त्यांस डामडौलाची आणि गाजावाजाची इच्छा मुळींच नव्हती, हें स्पष्ट दिसत होतें. आणखी त्यावरून असें उघड होतें कीं, त्यांना जे मानपान मिळाले, ते त्यांनीं प्रयत्न करून मिळविले नव्हते, तर ते त्यांच्या मागें लागले—त्यांच्या गळां पडले, ह्म-

णून ते त्यांस पतकरावे लागले. त्यांनीं जर नको ह्मटलें नसतें, तर "रावबहादुर" ही पदवी त्यांस, ते प्रथम इ० स० १८८२ त पेनशन घेऊन निघाले, तेव्हांच मिळाली असती. त्याचप्रमाणें रोगी पैसे देण्यास तयार असतां ह्यांनीं घेतले नाहींत, ह्यावरून ह्यांची निर्लोभता व्यक्त होते.

हरिश्चंद्र बाबांच्या ममताळूपणाचें आणि भूतदयेचें मोठें प्रमाण ह्मटलें ह्मणजे त्यांचा धर्मार्थ दवाखाना होय. तो त्यांनीं एकसारखा पन्नास वर्षे चालविला होता. त्यांत जातिभेद नव्हता. मनुष्य कोणत्याही जातीचा असो, गरीब असो का श्रीमंत असो, लहान असो का मोठा असो, त्यास औषध मिळत असे, त्यांत त्यांचा पुष्कळ वेळ जाई, त्यांना श्रम फार पडत, आणि मनस्वी पैसा खरचे, तरी त्यांनीं त्याची कधीं परवा केली नाहीं, कीं त्याविषयीं तोंडाबाहेर अक्षर काढिलें नाहीं. आपल्या बरोबरीच्या आणि आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या लोकांवरही हे फार ममता करीत असत. ते कधीं कोणावर रागावले नाहींत. दुसऱ्यांच्या अपराधांची क्षमा करण्यास ते नेहमीं सिद्ध असत. त्यांची जे कोणी निंदा करीत, त्यांची फजीती होत असे. आणि ती पाहून त्यांशीं हरिश्चंद्र बाबा अधिकाधिक उदारपणानें, थोरपणानें, आणि परोपकारशीलतेनें वागत असत. तें पाहून लोकांस नवल वाटे. हें त्यांचें साधुवर्तन पाहून लोकांचे ठायीं त्यांच्याविषयीं फार पूज्यबुद्धि उत्पन्न होत असे. अंतकाळीं देखील ते अगदीं साधूसा-

रखे दिसत होते. ह्यांविषयीं एके वेळीं सर भालचंद्र कृष्ण ह्मणाले कीं "हरिश्चंद्र बाबा हे मला पितृस्थानीं आहेत." सर भालचंद्रांसारख्या थोर सत्पुरुषांनीं हरिश्चंद्रबाबांविषयीं असे उद्गार काढावे, हा मान कांहीं सामान्य नव्हे. "साधु ह्मणावे ह्मणती नर माधवदास साधु याला जे" ह्या मोरोपंताच्या उक्तीची आठवण येथें झाल्यावांचून राहात नाहीं.

गुपचूपपणें आपलें कर्तव्य करीत असावें, हें हरिश्चंद्रबावांचें मोठें ब्रीद होतें. तें त्यांनीं आरंभापासून अखेरपर्यंत खासगी आणि सरकारी अशा दोन्ही प्रकारच्या कामांत पूर्णपणें पाळिलें होतें. ते प्रीतिवंत पिते होते, प्रामाणिक कामदार होते, विश्वासू मित्र होते, दयाळू यजमान होते, आणि सर्वभूतीं दया करणारे होते. ह्या संबंधाच्या कर्तव्यांत त्यांस मनस्वी त्रास होत असे, तरी तो ते निमूटपणें सोशीत असत. तो लौकिकाच्या आशेनें सोशीत नसत, कर्तव्यें आहेत तीं केलींच पाहिजेत, अशा निश्चयाच्या बळानें सोशीत असत.

हे त्यांच्या अंगीं सद्गुण होते. ह्यावरून त्यांच्या अंगीं दोष मुळींच नव्हते, असें कोणीं समजूं नये. मनुष्य आहे, त्याच्या ठायीं कांहीं दोष असलेच पाहिजेत. त्यांत भितरेपणा आणि एकलकोंडेपणा हे दोष त्यांच्या मध्यें होते. पण, त्यांच्या आंगच्या सद्गुणांपुढें हे कांहींच नव्हते. आणखी, त्यांच्या एकंदर चरित्राचा विचार केला ह्मणजे कोणालाही असें कबूल करावें लागेल कीं, त्यांनीं आपलें सगळें आयुष्य चांगल्या साध्या

आणि पवित्र आचरणांत घालविलें. आणखी ते नेहमीं असें ह्मणत असत कीं, मी लहान होतों तेव्हां माझ्या मातुश्रीनें मोठ्या काळजीनें आणि कष्टानें जें उत्तम नीतिशिक्षण मला दिलें त्याचें हें सगळें फळ आहे. तसें शिक्षण तिनें मला दिलें, त्याच्याच बळावर मला ह्या जगामध्यें नानाप्रकारच्या मोहांतून आणि नानाप्रकारच्या संकटांतून सुरक्षितपणें पार पडतां आलें. हें हरिश्चंद्रबाबांचें बोलणें आमच्या सध्यांच्या तरुण होतकरू मंडळीस फार विचार करण्यासारखें आहे. त्यांत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, आया तेथून सगळ्या सारख्या असतात, त्या आपल्या मुलांस नेहमीं उत्तम रीति लावण्याचा प्रयत्न करीत असतात, आणि उत्तम उपदेश करीत असतात. ह्यास अपवाद सहसा सांपडावयाचा नाहीं. पण, मुलांनीं एकनिष्ठेनें आईचें ऐकिलें, आणि त्याप्रमाणें वर्तन ठेविलें, तर असें इष्ट फल यावयाचें आहे, एरव्हीं यावयाचें नाहीं, ह्मातान्यांना काय समजतें आहे, असें मनांत आणणाऱ्या अपत्यांस हें फल अप्राप्त आहे. त्याचीं उदाहरणें विद्यमानीं पुष्कळ दिसत आहेत.

---

## भाग नववा.

### त्यांच्या कांहीं विशेष गोष्टी.

१. त्यांनीं आपल्या हयातींत एकंदर लग्नमुंजीचीं कार्यें आपल्या कुटुंबांत एकतीस केलीं, आणि अशा कार्यांस पुष्कळ इतर लोकांस मदत दिली.

२. ३४ वर्षे हपिसांत दररोज दाहा वाजल्यापासून पांच वाजतपर्यंत ते असत. पण त्यांनीं तेथें कधींही चहा किंवा पाणी घेतलें नाहीं.

३. त्यांनीं पेनशनाचा उपभोग २३$\frac{1}{2}$ वर्षें घेतला. त्याची एकंदर रकम ७०५०० रुपये होते.

४. ह्यांना सखा भाऊ मुळींच नव्हता. तरी, ह्यांचे माऊसभाऊ भास्कर बापू जोशी, नाना बापू जोशी, विनायक बापू जोशी, शंकर बापू जावळे, आणि मदन बापू जावळे, त्याप्रमाणेंच माऊसभावांचे चिरंजीव डा. मोरेश्वर जनार्दन, आणि सखाराम अनंत शास्त्री ह्या सगळ्यांवर त्यांचें इतकें प्रेम होतें कीं, तितकें प्रेम सख्या भावांत कधीं दृष्टीस पडायाचें नाहीं. आणि ते ह्यांस विचारल्याशिवाय इकडची काडी तिकडे करीत नसत.

५. पिकेट रोडवरचे हनुमानाचें देऊळ, पारशी गृहस्थाकडे कोणी लबाडीनें गाहाण टाकिलें होतें. तें त्याच्या स्वाधीन राहूं नये, आणि त्याचा उपयोग सार्वजनिक कामास व्हावा, ह्मणून, लोकांच्या विनंतीवरून, हरिश्चंद्रबाबांनीं वर्गणीनें पैसा जमवून, तें देऊळ गाहाणदारींतून मोकळें केलें. आतां तें सार्वजनिक कामास उपयोगीं पडत आहे.

६. मि. खिमजी जीवा ह्मणून एक भाट्या व्यापारी लक्षाधीश होता, त्याला हरिश्चंद्रबाबांनीं औषध देऊन बरें केलें होतें. त्याबद्दल ते त्यापासून कांहीं एक घेईनात, नकोच ह्मणत. ह्मणून त्यानें आपल्या मृत्युपत्रांत ह्यांस २००० रुपये देण्या-

विषयीं लिहून ठेविलें. ते त्यांना घ्यावे लागले. पण ते घेऊन त्यांनीं दानधर्मांतच खरचिले.

७. इ० स० १८८२ त हे प्रथम सरकारी काम सोडून पेनशन घेऊन निघाले, तेव्हां, कष्टम कमिशनर, सर चार्लेस प्रिचर्ड ह्यांनीं त्यांस विचारिलें कीं, " आपण सरकारची नौकरी इमानें इतबारें केल्याबद्दल आपणांस कांहीं पदवी द्यावी, अशी इच्छा आपणांस असल्यास मी सरकारांत लिहितों." त्यांस ह्यांनीं उत्तर दिलें " आपण मला असें ह्मटलें, हेच मला मोठे उपकार वाटतात. मला पदवी कांहीं नको आहे."

८. सर चार्लेस प्रिचर्ड हे कष्टम कमिशनर असतां, हरिश्चंद्रबाबांची कर्तबगारी त्यांस ठाऊक झाली होती. आणि त्यांस इ० स० १८९४ त परत नौकरीवर बोलावून आणिलें, तेव्हां सर प्रिचर्ड हे, व्हैसराय साहेबांच्या कौंसलाचे मेंबर झालेले असून मुंबईस आले होते. ते हरिश्चंद्रबाबांस बुद्ध्या भेटायास गेले, आणि मोठ्या प्रेमानें त्यांस सलाम करून ह्मणाले, "तुह्मी सरकारची नौकरी इमानेंइतबारें केली आहे, ती मनांत आणून, एवढा सन्मान करून सरकारनें तुह्मांस परत कामावर बोलाविलें आहे, ह्याबद्दल मी तुमचें अभिनंदन करितों. तुह्मी माझ्यापेक्षां तरुण दिसत आहां ( पण ते खरोखर तरुण नव्हते ) त्यापक्षीं तुह्मी मोठ्या हौसेनें सरकारचें काम पुष्कळ दिवस कराल, अशी मला आशा आहे."

९. एक कोट रुपयांच्या जिनगीविषयीं दोन हिंदु भा-

वांचा वाद पडला होता. त्या दोघां भावांचा आणि त्यांच्या बाडवडिलांचा पूर्ण विश्वास हरिश्चंद्रांवर होता. त्या दोघां भावांनीं त्यांस स्वसंतोषानें पंच नेमून, ते निर्णय करतील तो शिरसावंद्य मानण्याची कबुली केली. परंतु, हरिश्चंद्रबाबांस असें वाटलें कीं, कसा निर्णय केला तरी कोणी तरी एक थोडा-बहुत असंतुष्ट होणार आहे, त्या पक्षीं त्यांत मुळींच न पडावें हें बरें. ह्मणून त्यांनीं त्यांना लागलेंच साफ नाहीं ह्मणून सांगितलें.

१०. एका श्रीमंत वाण्यानें आपली मोठी जिनगी एकदा ह्यांच्या स्वाधीन केली, आणि तिची वहिवाट त्यांस करायास सांगितली. ती त्यांनीं एकसारखी पांच वर्षे केली, आणि सगळा हिशेबठिशेब बरोबर दाखवून, त्याबद्दल वेतन तो देत असतां तें न घेतां, ती त्याची त्याला परत दिली.

११. एकदा एक नवा रामोशी ह्यांच्या दाराशीं पाहारा करीत असतां, हे आंत जात होते ह्यांस न ओळखतां, ह्यांच्या आंगावर आला, आणि ह्यांस वर जाण्यास हरकत करूं लागला. तेव्हां जवळच एक पारशी गृहस्थ उभा होता, त्यानें त्याची कानउघाडणी केली, आणि ते शेट आहेत असें सांगितलें. त्यांस हरिश्चंद्रबाबा ह्मणाले, "त्याच्याकडे काय आहे. तो नवा माणूस आहे. एरव्हीं त्यानें कधींही असें केलें नसतें."

१२. एके वेळीं हरिश्चंद्रबाबा मोठ्या दुखण्यांतून नुकतेच उठले होते, अतिशयित अशक्त झाले होते, खोलीच्या बाहेर पडत नव्हते, आणि बाहेर बिलकूल जाऊं नये आणि काम

करूं नये अशी त्यांस वैद्याची ताकीद होती. अशा संधीस मांडवींतला एक वाणी त्यांजकडे येऊन, त्यांस अतिशयित काकुळतीनें अशी विनंति करूं लागला कीं, माझी आई अतिशयित आजारी आहे, तिला पाहून आपण औषध द्यावें. तें ऐकून, काठी टेंकीत टेंकीत, हरिश्चंद्रबाबा त्याच्या घरीं गेले, आणि त्यांनीं त्या बाईला औषध दिलें. तेणेंकरून त्या वाण्यास आणि त्याच्या आईस त्यांचे फार फार उपकार वाटले.

१३. हे पन्नास रुपयांवर असतां ह्यांची बदली शंभर रुपयांवर कष्टमच्या दुसऱ्या एका खात्यांत करावी असें ठरलें होतें. परंतु, त्या खात्याचा लौकिक फार वाईट झाला होता. ह्मणून, हरिश्चंद्रबाबांनीं ती बढती नको ह्मणून आपल्या मूळच्याच खात्यांत आपणांस ठेवण्याविषयीं वरिष्ठांस विनंति केली. ही त्यांची सुशीलतेची वृत्ति पाहून त्यांच्या वरिष्ठांस फार आश्चर्य वाटलें, आणि त्यांनीं त्यांस तेथच्या तेथेंच शंभर रुपये केले.

१४. इ० स० १९०० ह्या वर्षी कर्नल ब्लेनर हेस्ट, मुंबईचे प्रेसिडेन्सी सर्जन, ह्यांस हरिश्चंद्रांच्या घोड्याचा धक्का लागून फार इजा झाली, आणि त्या नुकसानीबद्दल त्यांनीं त्यांवर ५००० रुपयांचा दावा केला. परंतु, तंटा सरकारांत नेण्याविषयीं हरिश्चंद्रबाबांस मोठा वीट असल्यावरून त्यांनीं डा. पोलन ह्यांस मध्यस्थीस घालून तो वाद आपसांत मिटविला. तें पाहून कर्नल साहेबांस मोठें आश्चर्य वाटलें.

१५. एकाद्या तंट्याची पंचाईत ह्यांजकडे आली ह्मणजे हे होईल तितकें करून तो आपसांत मिटविण्याचा प्रयत्न करीत. कांकीं, त्यांस सरकारदरबारचा मोठा तिटकारा होता.

१६. त्यांना हांव अशी कशाचीच नव्हती. ते नेहमीं प्राप्ततृप्त असून, अन्न, वस्त्र किंवा दुसरे ऐषआराम ह्यांत त्यांचें मन मुळींच नव्हतें. हें त्यांच्या नेहमींच्या वर्तणुकीवरून स्पष्ट दिसत होतें.

## भाग दाहावा.

### त्यांविषयीं जन काय ह्मणतें.

सत्कर्मयोगें वय घालवावें
सर्वांमुखीं मंगल बोलवावें.

रामदास.

हें थोडक्यांत सांगतां येतें. पण, तें साधायास जन्मभर श्रम करावे लागतात. ती एक तपश्चर्याच असते. तिला मध्यें अनंत विघ्नें येतात, तीं टाळून आणि त्यांचें निवारण करून त्यांतून पार पडणें फार कठिण असतें. तें सर्वांस साधत नाहीं. तें हरिश्चंद्रबाबांस साधलें. त्याचीं प्रमाणें अनेक आहेत. त्यांतच लोकांच्या उद्गारांची गणना आहे. त्या उद्गारांचा समावेश ह्या भागांत जशाच्या तसा करितों. हे उद्गार ह्मणजे कीर्तीचें प्रतिबिंब आहे.

## DEATH OF A CUSTOMS OFFICER.

Rao Bahadur Harischandra Krishna Joshi, J. P., died at his residence in Kalbadevi Road, Bombay, on Thursday afternoon, at the age of 81. He was a Brahmin gentleman, whose ancestor, Krishna Joshi, came to Bombay in the year 1690, from Kelva-Mahim, in the Thana District. Krishna Joshi was one of the earliest settlers in Bombay, his contemporaries being the well-known Parsee Shettia, Mr. Lowjee Nassarwanjee Wadia, and the rich Rubjee Dhanjee Modi, who laid the foundation of the influential Bombay Kapol Bania family, which subsequently gave to the community its leaders. Krishna Joshi's grandson was Har Joshi, and Har Joshi's grandson was the deceased, who was born in 1825. Educated in an English Missionary School, he entered Government service in 1851, as a clerk in the customs, on a salary of Rs. 20 per month, from which, by dint of honesty and hard work, he rose to be Second Appraiser on Rs. 500 a month, in 1876. In 1882, after a service of 31 years, he retired on full pension. Twelve years later, on the imposition of Import Duties in 1894, he, appeared again in his old scene of action at the call of Government, for his services were required, as was remarked in these columns at the time, not only in the interests of revenue, but by way of consulting the convenience of the mercantile community, who would have been put to serious trouble and inconvenience, were the complicated questions of levying duties left to less experienced officers. Including the pension, his salary was espe-

cially fixed at Rs. 750. He finally retired on 1st January 1897. Government officers of high position have testified to his excellent services; among these are, Mr. W. R. Pratt, I. C. S., Sir Andrew Wingate, Sir James Campbell, the Hon. Mr. W. W. Loch, the Hon. Dr. J. Pollen and Mr. R. M. Kennedy, I. C. S., all of whom had to do with customs revenue, either as Collectors or Commissioners. On his first retirement in 1882, he was awarded one year's full pay, Rs. 6000; in 1896, he was Gazetted a Justice of the Peace for the city of Bombay. In 1897, on the occasion of the Queen Empress' Diamond Jubilee, a certificate of Honor signed by the then Governor of Bombay, Lord Sandhurst, was presented to him in the name of the Queen Empress, and by command of his Excellency the Viceroy and Governor-General, in recognition of his eminent official services extending over a period of 46 years. In January 1900, the title of "Rao Bahadur" was conferred on him as personal distinction. Irrespective of caste or creed, he treated sufferers and patients in a charitable dispensary he had opened, and by means of which he was the means of benefitting hundreds of his fellow-creatures by practising his family profession of medicine, according to the principles of that science as inculcated in the sacred Hindoo Shastras. For 45 years he continued in this practice, giving medicine free of charge; and it is estimated that in this he must have spent about Rs. 45000. Simple in his habits, he was moderate, upright, of a remarkably placid temper, and very religious. To perpetuate the memory of his parents, he built at

नगर वाचनालय सातारा

Dadar premises for the use of Hindoos on festive and auspicious occasions at a cost of about Rs. 18000. Dharamsalas in Bombay and in Kelwa-Mahim were also built by him for the purpose of facilitating the performance of ceremonies concerning funeral rites. He also established two schools for the study of Sanskrit, one at Chinchani and another at Kelwa-Mahim, both of which places are situated in the Thana District. He leaves a widow and four sons to mourn his loss. His funeral was largerly attended. *Times of India, January 6, 1906.*

## *A DEPARTED GOOD MAN.*

With regard to the death of Rao Bhadur Harischandra Joshi, a correspondent favours us with the following information:—Rao Bahadur Harischandra Krishna Joshi's family is very ancient, respectable, and renowned in the medical profession for generations. Mr. Krishna Joshi was the first person of his family who had come to Bombay as early as 1690 A. D., and became famous as a " Vaidya. " Among his descendants Mr. Har Joshi was very celebrated in Bombay. His grand-son Rao Bahadur Harischandra was born in 1825. He lost his parents in his youth, and entered, after being educated at a Missionary School, Government service in H. M.'s Customs as a clerk on Rs. 20, in 1851. By dint of hard work and honesty, he rose to be Second Appraiser on Rs. 500, in 1876 and retired in 1882. Twelve years later his services were again called into requisition on the

imposition of Import Duties in 1894. He finally retired in 1897. While in office, officers of high position as Sir Charles Pritchard, Sir James Campbell, the Hon'ble Dr. Pollen, and Mr. R. M. Kennedy, highly appreciated his services, acknowledging his integrity and honesty. His salary including pension was specially fixed at Rs. 750.

He had opened a charitable dispensary at his residence wherein he treated sufferers irrespective of caste or creed, free of charge. Hundreds of poor people received the benefit of his medicines and although he was in Government service for over 34 years, he kept this stream of his charity constantly open for 50 years.

To perpetuate the memory of his parents, he built at Dadar a house for the use of Hindoos on festive and auspicious occasions. Dhuramshalas were also built in Bombay and at Kelwa-Mahim. He established schools for the study of Sanskrit, one at Chinchani and another at Kelwa-Mahim, both in the Thana District. He also made many charities secretly. All his charities amount to over Rs. 45000. Simplicity in his habits, moderation, uprightness, remarkable placidity of his temper, were the characteristics of his nature. On account of his saintly character he was very much loved and respected by all the classes of people in Bombay. In 1882 he was awarded Rs. 6000. In 1896 he was made Justice of the Peace. In 1897 he received a "Certificate of Honour" "in recognition of his eminent official services extending over a period of 46 years." In 1900, the title of

Rao Bahadur was conferred upon him as a personal distinction. He leaves behind a widow and four sons to mourn his loss. *Mahratta, January 14, 1906.*

* * * * * *

## *THE LATE RAO BAHADUR HARISCHANDRA KRISHNA JOSHI, J. P.*

RaoBahadur Harischandra Krishna Joshi, who died at his residence in Bombay in December 1905, (January 1906), was descended from an ancient and respectable family, well-known for generations in the medical profession. His ancestor, Krishna Joshi, was the earliest amongst those who came to Bombay, so far back as 1690 A. D. from Kelwa-Mahim, and acquired fame as a Vaidya or medical practitioner.

Rao Bahadur Harischandra Krishna Joshi was born in Bombay on 26th November (7th October), 1825 and lost his parents when he had hardly completed his English education. He then entered Government service in H. M.'s Customs in 1850 as a clerk on a small salary, and by gradual promotions, which he owed to his hard work and honesty, he finally became in 1876 Second Appraiser on Rs. 500 a month, which post he held till he retired on full pension in 1882. He was however called back from his retirement after twelve years at the advanced age of 68 on the re-imposition of Import Duties in India 1894. As was published at the time, "the interests of the (Government) revenue," and the "convenience

of the mercantile community of Bombay," necessitated his re-employment. On this occasion his salary, including pension, was specially fixed at Rs. 750 a month, and he finally retired on 1st January 1897.

While in office his integrity and honesty and thorough efficiency in work, aided by his long experience and special knowledge in market rates, and his successful efforts in collecting duties without unnecessary interference and friction, were readily acknowledged. Among the high officials who appreciated his services were Sir Charles Pritchard, Mr. W. R. Pratt, I.C.S., Sir A. Wingate, Sir James Campbell, the Hon. Dr. J. Pollen, and the Honourable Mr. R. M. Kennedy.

In 1882, on his first retirement, he was awarded Rs. 6000 (one year's full pay) for his faithful services to Government, and was made a Justice of the Peace, and in 1897, on the Diamond Jubilee Day of Her late Majesty, Queen Victoria, Lord Sandhurst presented to him a "certificate of Honour" in recognition of his eminent official services, extending over a period of 46 years. In 1900, the title of "Rao Bahadur," was conferred upon his as a personal distinction, and in the same year the Honourable Dr. Pollen presented to him, on behalf of his brother officers, a hansdome silver casket as a token of their affection and esteem. At the same time H. H. Shri Shankeracharya, of Jotirmath, presented to him an address, recogniging his many virtuous qualities.

The late Rao Bahadur maintained, at his own

expense, a charitable dispensary for over 50 years and saw to it personally. All classes of people, without distinction, received the benefit of his medicines. Though in Government service for 34 years, he never neglected this noble duty of affording relief to poor sufferers, and has done it quietly and without fuss.

Besides this he has built a Dharamsala at Kelwa-Mahim for the benefit of the Hindoos, and another in Bombay. Two Vedshalas or Sanskrit schools, one at Chinchani and the other at Kelwa-Mahim, both in the Thana District, were also founded by him, while his private charities have been numerous.

Rao Bahadur Joshi was a leading member of the Yajurvediya Palshiker Brahmin Community of Bombay and a member of the Bombay Hindoo Burning and Burial Ground's Committee.

Simplicity in his habits and moderation in all things were the characteristics of his nature. His uprightness and integrity, geniality of disposition, and his charities had endeared him to the people and officials alike. His private life was absolutely uncorrupted and unstained. *Men and Women of India, January 1906.*

**मुंबईवैभव.** ता. ६ जानेवारी, १९०६.

**रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी जे. पी. ह्यांचा शोचनीय मृत्यु.**

"येथील सुप्रसिद्ध वैद्य आणि सरकारी पेन्शनर रावबहादूर हरिश्चंद्र कृष्ण जोशी, जे. पी., यांना गुरुवारीं दोनप्रहरीं त्यांच्या काळबादेवी-

पाने ९४
दा.नं.८८४५३
च ३०५

वरील घरीं देवाज्ञा झाली, असें कळविण्यास आह्मांला फार फार वाईट वाटतें. मरणसमयीं त्यांचें वय एक्यायशीं वर्षांचें होतें. त्यांच्या प्रेतयात्रेबरोबर बराच लोकसमुदाय गेलेला असून त्यांच्या मृत्यूचे स्मरणार्थ मेसर्स ठाणावाला, रामचंद्र गोविंद अॅन्ड सन, राधाबाई आत्माराम सगुण, फकीरजी दिनशा, गिल्डर अॅड कंपनी वगैरे कंपन्यांनीं आपलीं दुकानें बंद ठेविलीं होतीं. ह्यांच्या मृत्यूमुळें मुंबापुरांतील जुन्या पिढीमधले एक कर्तृत्ववान् पुरुष नाहींतसे झाले असून त्यामुळें मुंबई शहराची मोठीच हानि झालेली आहे, असें ह्मणावयास हरकत नाहीं. कारण, येथील समाजांतील जुनीजुनी अनुभवशीर माणसें कमी कमी होऊं लागलीं असून त्यांचे जागीं फारशी तशी तरुण मंडळी पुढें सरसावत नाहीं. त्यामुळें येथील महाराष्ट्रीय लोकसमाजाचें वजन दिवसेंदिवस कमीकमी होऊं लागलें आहे, असें सर्वांना ठाऊकच आहे. तेव्हां अशा दृष्टीनें आमच्या येथील समाजाचें ज्यांनीं ज्यांनीं वजन वाढविलें आहे, त्यांपैकीं जी कांहीं थोडीबहुत वयोवृद्ध सन्मान्य मंडळी अजून हयात आहेत, त्यांतलेच कैला. रावबहादूर हरिश्चंद्र कृष्ण जोशी हेही होते. तेव्हां अशा गृहस्थांच्या मृत्यूमुळें समाजाची मोठी हानि होणें साहजिकच आहे. सदर हानि किती मोठी झालेली आहे त्याची आमचे वाचकांना कांहीं अटकळ करितां यावी ह्मणून आह्मीं त्यांचे चरित्र पुढें सादर केलेलें आहे. कै. रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी हे यजुर्वेदीय पळशीकर ब्राह्मणवर्गांतले असून त्यांचें घराणें प्रथम केळवें माहीम येथें वैद्यकीमुळें प्रसिद्धीस आलें. कैला. कृष्णजोशी रा. ब. हरिश्चंद्र कृष्णजोशी यांचे प्रपितामह, हे इसवी सन १६९० च्या सुमारास मुंबईला येऊन राहिले आणि त्यांनीं आपल्या वैद्यकीच्या धंद्यामध्यें येथें असतां बराच लौकिक संपादिला. त्याच्या

नंतर ह्याच घराण्यांतील बरेच पुरुष वैद्यकीच्या धंद्यांत उदयाला आले. अशा सुप्रसिद्ध घराण्यामध्यें रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी यांचा इसवी सन १८२५ सालीं जन्म झाला. त्यांच्या इंग्रजी भाषेचा अभ्यास पुरा होतो न होतो तोंच दुर्दैवेंकरून त्यांचे आई-बाप मरण पावले. तेव्हां त्यांना इसवी सन १८५० सालच्या सुमाराला येथील कस्टम खात्यांत वीस रुपये दरमहाची कारकुनीची नोकरी धरणें भाग पडलें. पण त्याच वीस रुपयांच्या नोकरीवरून निरालस्य, नेकी आणि नियमत्वपणा ह्या गुणांमुळें हळहळ वाढत जाऊन ते शेवटीं दरमहा ५०० शें रुपयांच्या सेकंड अप्रेझरचे जागेपर्यंत चढले. ह्याच जागेवर ते इसवी सन १८७६ सालापासून ते ८२ सालापर्यंत होते. नंतर त्यांनीं पेन्शन घेतलें. पण पुढें इसवी सन १८९४ सालीं जेव्हां आयात मालावर जकात बसली तेव्हां सरकारच्या उत्पन्नाला धक्का लागूं नये आणि व्यापारी लोकांचीही गैरसोय होऊं नये अशा सरळ धोरणानें वागणारे हेच जुने अनुभवशीर कष्टम खात्यांतील एक कामगार असल्या कारणानें त्यांना पुन्हां ( पेन्शन मिळून ) नोकरीवर दरमहा ७५० रुपयांच्या पगारावर बोलाविलें. सदहू जागेवर पूर्वींप्रमाणेंच तीन वर्षे इमानें-इतबारें काम केल्यावर त्यांनीं पुन्हां पेन्शन घेतलें. सरकारच्या उत्पन्नाला धक्का न लावितां आणि व्यापाऱ्यांचेंही नुकसान न करितां त्यांनीं आपली नोकरी बजाविल्यामुळें सर चार्लस प्रिचर्डप्रभृति सरकारी अंमलदारांनीं त्यांची चांगली चहा केली, आणि सरकारानेंही त्यांना जे. पी. आणि "रावबहादूर" अशा पदव्या देऊन त्यांचा सन्मान केला. पण ह्याच त्यांच्या चरित्रक्रमाबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत असें नसून, त्यांनीं नोकरी लागल्यापासून मरेपर्यंत ह्मणजे सुमारें ५० वर्षेपर्यंत आपल्या स्वतःच्या खर्चानें एक धर्मार्थ दवा-

खाना चालविला होता. आणि चिंचणी व केळवें माहिम येथें त्यांनीं वेदशाळा स्थापन केल्या आहेत, आणि एक दोन धर्मशाळाही बांधल्या आहेत, त्याबद्दल त्यांची विशेष ख्याति आहे. त्याखेरीज त्यांनीं गुप्त रीतीनें बराच धर्मादाय केलेला आहे. स्वभावानें साधे, निर्व्यसनी, आणि नियमित असल्या कारणानें, येथील समाजांत हे फारच लोकप्रिय होते. ह्यांना चार कर्ते चिरंजीव आहेत. त्यांवर आणि त्यांचे पत्नीवर त्यांच्या मृत्यूमुळें मोठाच प्रसंग येऊन गुदरला आहे. तरी जगाच्या रहाटीकडे लक्ष देऊन आणि ईश्वरावरच सर्व भार ठेवून त्यांनीं आपल्या मनाचें समाधान करून घ्यावें. दुसरा मार्ग नाहीं. अखेर त्यांच्या मागें त्यांच्याच सारखे बालबोध आणि बाणेदार मार्गानें वागून रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी ह्यांचे सर्व चिरंजीवही त्यांच्याचसारखे परोपकारी आणि लौकिकवान् होऊन आपल्या कुळाची मोठी मान्यता कायम राखतील, असा भरंवसा मानून आह्मी प्रस्तुत मृत्युलेख पुरा करितों."

* * * *

इंदुप्रकाश. ता. ५ जानेवारी १९०६.

## शोचनीय मृत्यु.

"येथील पेनशनर रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी जे. पी. यांस काल रोजीं देवाज्ञा झाली, हें कळविण्यास फार दिलगिरी वाटते. हे प्रथम १८५१ सालीं कष्टम खात्यांत रु. २० च्या पगारावर दाखल झाले, व आपल्या आंगच्या हुषारीनें त्या खात्यांत रु. ५०० पगारापर्यंत चढले. सन १८८२ सालीं त्यांनीं पेनशन घेतलें. नंतर सुमारें १२ वर्षें पेनशनाचा उपभोग घेतल्यावर सरकारास

फिरून त्यांच्या नोकरीची जरूर लागल्यावरून त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्या वेळीं त्यांस पेनशनसह रु. ७५० पगार मिळत होता. सन १८९७ सालीं त्यांनीं कायमचें पेनशन घेतलें. त्यांच्या संबंधानें त्या वेळच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं चांगले अभिप्राय दिलेले आहेत. आपली नोकरी संभाळून परोपकारार्थ ते गरीब लोकांस फुकट औषधें देत असत. धर्मादायाकडे त्यांची फार प्रवृत्ति होती. दादर, मुंबई, केळवें माहिम, चिंचणी वगैरे ठिकाणीं लोकोपयोगार्थ धर्मशाळा, पाठशाळा, व बंगले बांधले आहेत. यांचें घराणें फार जुनें व संभावित आहे. मरणसमयीं त्यांचें वय सुमारें ८० वर्षांचें होतें. त्यांच्या मागें त्यांची पत्नी व चार मुलगे याप्रमाणें परिवार आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

बालबोध. फेब्रुवारी १९०६.

"हे पहिल्यापासून मोठे कर्मठ आणि धार्मिक होते. आपल्या धर्माप्रमाणें संध्यादि नित्यकर्म झाल्याशिवाय ह्यांनीं कधीं अन्न घेतलें नाहीं. घरांत आणि बाहेर ते सर्वांशीं सभ्य रीतीनें, ममतेनें, आणि प्रामाणिकपणानें वर्तत असत. ह्यांना गर्व मुळींच नव्हता. ह्यांची वृत्ति फार शांत असे. ह्यांच्या मुखावाटे कधीं कठोर शब्द निघाला नाहीं. हे सर्व लहानमोठ्यांस सारखे प्रिय वाटत असत. मनाचा मोकळेपणा, सरलता आणि स्वधर्मनिष्ठा हे त्यांचे मुख्य गुण होते. त्यांचें प्रमाण त्यांच्या सर्व व्यवहारांत पटत असे. त्याच्या योगानें त्यांवर सर्व प्रकारचे लोक फार लोभ करीत असत, आणि त्यांस मान देत असत. आणि हा सगळा प्रसाद आपल्या मातुश्रीचा आहे असें ते ह्मणत असत. ते सुपुत्र, सज्जन, सन्मित्र

आणि स्वकर्तव्यपरायण एकनिष्ठ पुरुष होते. तेव्हां त्यांचें सगळें आयुष्य चांगल्या प्रकारें गेलें हें यथायोग्यच झालें.

हे एक दोन दिवस थोडेसे आजारी पडून क्लेश कांहींएक न होतां, तारीख ४ जानेवारी १९०६, रोजीं, अगदीं स्वस्थ चित्तानें मरण पावले. तेव्हां त्यांचें वय ८१ वर्षांचें होतें. ह्यांच्या आत्म्यास जगदीश्वरानें सद्गति दिली असलीच पाहिजे. त्यांस चार पुत्र आहेत; हेही आपल्या तीर्थरूपांप्रमाणेंच सुशील आहेत. ह्मणून आह्मी असें ह्मणतों कीं, "प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला तो नर भला भला", असें जें प्रसिद्ध कवि शिवदिनकेसरींनीं ह्मटलें आहे, तें ह्या चरित्राच्या नायकांस अगदीं तंतोतंत लागू पडत आहे. ह्याच्या पलीकडे मनुष्यास मिळवावयाचें तें काय राहिलें!"

* * * *

**ऐक्यवर्धक समूहाकडून** ता. २७ जानेवारी १९०६ रोजीं आलेल्या दुखवट्याच्या पत्रांतील उतारा.—

"नियमितपणा, पोक्तपणा, नम्रपणा, मनाचा व वर्तनाचा सरळपणा, औदार्य, धर्मपरायणता, धर्मशील आचरण, सत्यप्रीति व परोपकारबुद्धि हे गुण बाबासाहेबांच्या आंगीं उत्तम रीतीनें वसत होते. त्यामुळें ते फार लोकप्रिय झाले होते. व हे गुण प्रदर्शित करणारीं अनेक कृत्यें त्यांच्या हातून घडलीं आहेत, त्यांचें साद्यंत वर्णन करूं गेल्यास एखादें स्वतंत्र पुस्तक होईल.

बाबासाहेबांसारखा पुरुष पुनः मिळणें फार दुर्लभ, व त्यांची जागा भरून काढील असा पुरुष आज तरी कोणी दिसत नाहीं; पुढें झाल्यास आपल्या ज्ञातीचें महत् भाग्य समजावयाचें. अशा व्यक्ती वारंवार होतही नाहींत, तेव्हां त्यांच्या मरणामुळें जें नुकसान झालें आहे, त्याची भर कशानेंही होईलसें दिसत नाहीं."

* * * *

## विरहोद्गार.

**हरिणीवृत्त.**

हर ! हर ! कसें ? देवा नेलें हिरोनि नृरत्न कीं
बहुविधजनां होता ज्यांचा सदाश्रय नित्य कीं
तळमळ मना लावोनीयां यमा अदया अगा
अनुचित तुवां केलें आजी दिलास अह्मां दगा. १.

**दिंडी.**

तनयकल्याणा जननि झटे जैशी
स्वजनकाजीं सद्बुद्धि जया तैशी
त्यजुनि गेला कां? आजि अह्मां बाबा
जगीं ह्मणवोनी आपणांस वा ! बा. २.

**साकी.**

हरिश्चंद्र हें नाम राहिलें अजरामर या लोकीं
रावबहाद्दुर जयास दिधली पदवी नरपालें कीं,
पाहुनि गुणविभवा ॥ कार्यकुशलता विनया वा. ३.

**पद** [चा. हें काय बरें त्वां केलें.]

हें काय? विधात्या केलें, ध्रु०
वैभवशाली नरवर होते दयाळु आणिक मोठे दाते
चिरायु न त्वां केलें कां? तें कां? क्रूर तुझें मन झालें. ४.

**पद.**

सुखांत ठेव बंधु चार हे रमावरा
विनंति माझि आपणांस जोडुनि करा, ध्रु०
अतुल कीर्ति, विपुल धना, देइं या नरां
सत्कर्मं, यांकरवीं, घडविं ईश्वरा
आधि व्याधि हरुनि तयांवरि कृपा करा
हेतु सकल, पूर्ण करुनि, देइं आसरा.

**साकी.**

बाबांना आमुच्या विभो दे, उत्तम गति परलोकीं
शांताराम वदे कर जोडुनि, हेचि विनंती हो कीं,
आणिक मी कांहीं देवा तुज मागत नाहीं. ६.

रा. शांताराम विश्वनाथ आचार्य, केळवें माहीम.

## दुःखोपशमन.

**आर्या.**

अ–मल–ध्वज लावुनियां कीर्तीचा विप्र हा हरिश्चंद्र
गेला जैसा पूर्वीं ख्यात नृपाल जो हरिश्चंद्र. १.
आश्रितजनाश्रय तरुच काळें वातेंचि काय हालविला
किंवा मजला वाटे स्व–जन–समाज–स्थ–दीप मालविला. २.
याचकजनधनदाता त्राता दुःखार्णवांत बुडत्यांचा
गेला सोडुनि आजी घेइल तरि कोण शोध धड त्यांचा. ३.
दुर्वचनें त्वां केव्हां नाहीं बा दुखविलें निज–जनांतें
आजी गेलां सोडुनि तोडुनि कांहो समग्र जन–नातें. ४.
दुःखार्णवांत कांतापुत्रांतें आणि सर्व आप्तजनां
लोटुनि दुष्टा नेलें काळा निर्दय दुजा तुझ्यासम ना. ५.
परि नाशिवंत जाती देहादिक वस्तु सर्व नासोनी
अविनाशि एक आत्मा ज्ञाते त्यजितात शोक समजोनी. ६.
हें सुज्ञास लिहावें संबोधावें अयोग्य मज कळतें
परि तत्प्रेमनिबंधन वळवुनियां मन्मनास आकळतें. ७.
याचितसें तुज देवा सद्गति दे पुण्यवंत बाबांला
मागावें दात्या तुज काय कसें हें कळे न बा बाला. ८.

भास्कर देवापाशीं याचुनि ऐशा वरास विनयानें
विरह–ज–दुःख मनाचें सद्बोधें आपुलेंहि विलया ने. ९.

भास्करबुवा–राममंदिर–केळवें माहिम.

* * * *

आर्या.

गा जड पंचात्मक जो सुखदुःखायतन देह जायाचा
ज्ञाता जाणुनि ऐसे स्वानुभवें करिल खेद कां याचा. १.
अविट प्रिय सर्वगजें सन्निध आहे सदैव घनदाट
अप्रिय निंद्य अनित्यचि व्यक्त तया मृत्युची असे वाट. २.

श्लोक.

घटमठादि उपाधि नभा जसे
विविध देह निजस्वरुपीं तसे
नभ अभंगचि अंग घटास या
शरिरभंग तसा नच आत्मया. ३.

आत्मा अभंग अज नित्य सुखस्वरूप
ज्या नामवर्ण कुलजाति नसे स्वरूप
आला न जो समिप दूर कधीं न झाला
झाला सुयोग न वियोग उडोनि गेला. ४.
आला नसे तनुस घेउनि सांडिली न
झाला न जो गृह कलत्रिं कधीं विलीन
झालें न दुःख सुखलेश जयास कांहीं
आत्मा अखंड परिपूर्ण असेचि पाहीं. ५.
तो गा सरोदकविबिंबित चंद्र अंगें
भासे तसा पवनकंपित नीरसंगें

हा वासनेंत प्रतिबिंबित जीव भोगी
दुःखें सुखें निजरुपा परता वियोगी. ६.
दुःखार्ति यांस जनदुःखनिवारणार्थ
स्वांगेंचि भेटति नमी तरि हा यथार्थ
नाहींच भिन्न जग आपण सर्व कांहीं
सच्चित्सुखात्म निजरूपचि एक पाहीं. ७.
सुज्ञास हें कळविणें अतिनिंद्य वाटे
मैत्रि प्रभावगति घे तरि याच वाटे
याचा न खेद मनिं मानुनि लोभ ठेवा
हा अर्पितों निजमतें परिपूर्ण ठेवा. ८.

**रा. यशवंत दाजी जोशी चिंचणकर.**

* * * *

**चिंचणी येथील "सन्मित्रमंडल"** समाजाकडील पत्रांतील उताराः—

"त्यांच्यासारखे लोकप्रिय, उदार व गरिबांस विद्यादानादि आश्रयदाते आह्मां मंडळींत फारच दुर्मिळ असल्यामुळें आज मितीस आमच्यांतलें एक रत्नच हरवल्याप्रमाणें वाटत आहे."

* * * *

**મુંબઈ સમાચાર.** તા. ૬ જાનેવારી ૧૯૦૬.

## રાવબાહાદુર હરિશ્ચંદ્ર કૃષ્ણા જોશીનું મરણ.

"અત્રેની કસ્ટમ્સના એક જુના હીંદુ અમલદાર રાવબહાદુર હરીશ્ચંદ્ર કૃષ્ણા જોશી જે. પી. ના મરણની નોંધ લેતાં અમને દલગીરી ઉપજે છે.

મરનાર સને ૧૮૫૧ માં સરકારી કસ્ટમ્સ ખાતાંમાં રૂપયા વીસના માસીક દરમાયે એક કારકુન તરીકે જોડાયા હતા. જ્યાં

તેઓ પોતાની જાતી મેહનત અને પ્રામાણીકપણાથી વધીને સને ૧૮૭૬ માં માસીક રૂપયા ૫૦૦ ના દરમાયે માલની કીંમતની આંકણી કરનારા અમલદાર તરીકે નેમાયા હતા. આ ઓધો તેઓએ ૧૮૮૨ સુધી ભોગવ્યો હતો. જે પછી એકત્રીસ વરસની લાંબી સરકારી નોકરી બજાવી તેઓ પેનસન ઉપર ફારેગ થયા હતા. સને ૧૮૯૪ માં કાપડ ઉપર આયાત જગાત નાખવામાં આવવાના સબબે નામદાર સરકારે તેમના અનુભવની જરૂર ધારી તેમને પાછા સરકારી નોકરીમાં રૂપયા સાડી સાતસોના મોટા પગારે દાખલ કર્યા હતા પણ સને ૧૮૯૭ માં તેઓ સરકારી નોકરીમાંથી સેવટના વીદાય થયા હતા. સને ૧૯૦૦ ના સાલમાં નામદાર સરકારે તેમને રાવબહાદુરનો ખેતાબ, બક્ષયો હતો. એજ સાલમાં તેમના ભાઈબંધ અમલદારોએ તેમને એક માનપત્ર તેમના તરફની માનની લાગણી તરીકે અર્પણ કર્યું હતું. મરનારે જુદી જુદી સખાવતોનાં કામમાં પણ સારો હીસ્સો આપ્યો હતો. તેઓએ પોતાના મકાન આગળ ધરમાદા દવાખાનું ઉઘાડયું હતું, જ્યાં સંખ્યાબંધ ગરીબ દરદીઓ તેનો લાભ હાલ લેછે. તેઓએ સખાવતનાં કામ પાછળ ૪૫૦૦૦ રૂપયાની મોટી રકમ ખરચી છે. મરનારે પોતાના માતાપીતાની યાદગારી જાળવી રાખવા હીંદુઓના સર અવસરે કામ લાગે તેમાટે રૂપયા ૧૮૦૦૦ ને ખરચે દાદર ખાતે મકાન બાંધ્યું હતું. વળી તેઓએ કેળવેમાહીમ ખાતે એક ધર્મશાળા તથા પાઠશાળા અને સંસ્કૃત શાળાઓ પણ સ્થાપી હતી.''

❀ ❀ ❀ ❀

**સાંજ વર્તમાન** તા. ૫ જાનેવારી ૧૯૦૬.

## રાવબહાદુર હરીશચંદર કીષણા જોશીનું મરણ

''જણાવવાને દલગીરી ઉપજે છે કે, રાવબહાદુર હરીશ-

ચંદર ક્રીષ્ણા જોશી જે. પી. ગઈ કાલે પાછલા પોહોરના ૩ કલાકે કાલબાદેવી ઉપર આવેલા પોતાના રહેવાના મકાનમાં ૮૧ વરસની વયે દેવલોક થયા છે. રા. બા. જોશી નાની ઉમરે સરકારી કસટમસ ખાતામાં નજીવા પગારે ૧૮૫૧ માં જોડાયા હતા. જ્યાં આગળ પોતાની ચાલાકી અને પ્રામાણીકપણે ધીમે ધીમે વધીને રૂ. ૫૦૦ ના પગારે બીજા એપ્રાઈઝર તરીકે તેમની નેમણુક થઇ હતી. એ ઓધા ઉપરથી તેઓ ૧૮૮૨ માં રીટાચર થયા હતા. ૧૨ વરસ સુધી સરકારી નોકરીમાંથી ફારેગ રહ્યાં પછી ૧૮૯૪ માં જ્યારે સરકારે આયાત જકાતનું ધોરણ દાખલ કીધું તે વેલાએ મરહુમને નામદાર સરકારે ફરી રૂ. ૭૫૦ ના માસીક પગારે રોકયા હતા. એ નોકરીમાંથી તેઓ ૧૮૯૭ માં સેવટના ફારેગ થયા હતા. પોતાની લાંબી કારકીરદી દરમયાન મરહુમે સર ચાર્લસ પ્રીચર્ડ, સર જેમસ કેમબેલ, સરખો વીંગેટ અને ડા. જોન પોલન જેવા અમલદારોનો ચાહ પોતા તરફ ખેચ્યો હતો અને ૧૮૮૨ માં તેમની નીમકહલાલ નોકરી માટે સરકારે તેમને એક વરસનો પગાર રૂ. ૬૦૦૦ બક્ષેસ આપયા હતા. ૧૮૯૬ માં મરહુમની સુલેહના અમલદાર તરીકે નેમણુક થઈ હતી, અને ચાર વરસ પછી " રાવબહાદુર " નો ખેતાબ મેલવવાને મરહુમ નસીબવંત નીવડ્યા હતા.

મરહુમ પોતાના પીતાથી વઇદનો ધંધો શીખયા હતા, જેનો લાભ તેઓએ ૫૦ વરસ સુધી ગરીબોને મફત આપયો હતો. મરહુમે ખાનગી અને જાહેર મળીને રૂ. ૪૫૦૦૦ ની સખાવત કીધી હતી.

ગઇ કાલે મરહુમને અગનીદા કરવાની ક્રીયામાં તેમના મીત્રો અને વખાણનારાઓની મોટી સંખ્યાએ ભાગ લીધો હતો, અને તેમના માનમાં કાલબાદેવી રોડ ઉપર આવેલી મેસરસ થાણાવાલાની કંપની, મીસીસ રાધાબાઈ આત્મારામ, મેસ-

રસ રામચંદર ગોવીંદ પટેલ બીરાદરો, ફકીરજી દીનશાહ વીગેરેએ પોતાની દુકાનો બંધ રાખી હતી.”

* * * *

**સાંજનું જામે.** તા. ૬ જાનેવારી ૧૯૦૬.

## દેશી કસ્ટમ્સ અમલદારનું મરણ.

“મુંબઈના કસ્ટમ્સ ખાતાંના એક માજી દેશી અમલદાર રા. બા. હરીચંદ્ર કૃષ્ણા જોશી ૮૧ વરસની વયે ગયા ભરેસપતવારે કાલબાદેવીના મકાનમાં મરન પામ્યા હતા. મરનાર રૂ. ૨૦ ના પગારે ૧૮૫૭ માં કસ્ટમ્સ ખાતાંની નોકરીમાં દાખલ થયા હતા અને રૂ. ૫૦૦ ના દરમાયા સુધી વધ્યા હતા. ૩૧ વરસની નોકરી પછી ૧૮૮૨ માં તેવણ સરકારી નોકરીમાંથી રીટાયર થયા હતા. ૧૮૯૪ માં નવી આયાત જગાત નખાઈ તે વખતે તેવણ પાછા સરકારી નોકરીમાં જોડાયા હતા. અને ૧૮૯૭ માં રીટાયર થયા હતા. મરનાર એક સુલેહના અમલદાર હતા અને ૧૯૦૦ ના સાલમાં સરકારે તેવણને રાવબહાદુરનો ખેતાબ એનાયત કર્યો હતો. મરનારે કેટલાંક સખાવતનાં કામો કર્યાં હતાં.”

---

# भाग अकरावा.

## उपसंहार.

उपजणें मरणें न चुके नरा
फिरत नित्य असे भवभोंवरा
उपजला तरि तोचि मला गमे
कुल समुन्नति ज्यास्तव घे रमे.

वामन.

मृत्युलोकचा वास हा जन्ममरण महायात्रेंतला एक मुक्काम आहे. हा करणें न करणें माणसाच्या हातचें नाहीं. देवाच्या हातचें आहे. तो करणें त्याला भाग पडतें. पण तो चांगला करणें किंवा वाईट करणें हें मात्र त्याच्या स्वाधीन असतें. आणखी चांगले मुकाम कोणाचे झाले आहेत, व वाईट कोणाचे झाले आहेत, हें, डोळे उघडले असतां, सध्याच्या काळांत सहज दिसण्या-सारखें असतें. आणखी चांगला मुकाम केल्याच्या नुसत्या अल्पस्वल्प खुणांवरूनही त्या मुक्काम करणाऱ्यास चांगलेंवाईट ह्मणतां येतें. एकाद्या झाडाखालीं आपण उतरायास गेलों, आणि आपणांस तेथें जागा चांगली झाडलेली दिसली, केर दूर टाकून दिलेला दिसला, पाणी मारून धुरळा बसविलेला दिसला, आसपासच्या रानफुलांचे झुबके एकाद्या झाडाच्या फांदीवर रांगेनें सुंदर मांडलेले दिसले, आणि भोंवतीं लहान लहान दगडांची रांग लावून बसायास जागा केलेली दिसली, ह्मणजे आपल्या मनांत आपोआप असें येतें कीं, या ठिकाणीं मुक्काम करून गेलेला माणूस चांगला उद्योगी, निर्मळ, शु-चिर्भूत, आणि रसिक असला पाहिजे, आणि तो कोण हें ठाऊक नसतांही त्याच्याविषयीं अंतःकरणांत पूज्यबुद्धि आ-पोआप उत्पन्न होऊन, त्याचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति सहजीं आपणांमध्यें उत्पन्न होते. तोच प्रकार ह्या जन्ममरण-

यात्रेंतल्या मुकामास पुष्कळ अंशीं लागू आहे. प्रकृत विषयाच्या संबंधानें पाहिलें तर हरिश्चंद्रबाबा तर आपला मुक्काम संपवून निघून गेले आहेत. त्यांच्या मृन्मय देहाचें कांहींएक ह्या पृथ्वीवर राहिलें नाहीं. परंतु, त्यांच्या जीवानें किंवा पवित्र आत्म्यानें जें काय करून ठेविलें आहे, तें चिरस्थायी होऊन आपणांस दिसत आहे, आणि तें असें पिढ्यानपिढी दिसणार आहे. त्यांच्या धर्मशाळा, त्यांच्या पाठशाळा, त्यांच्या दुसऱ्या धर्मार्थसंस्था ह्या अनंत गरीब गुरिबांच्या उपयोगीं पडून, ज्या ज्या विचारी लोकांच्या दृष्टीस पडतील, त्या सर्वांस त्यांपासून लाभ होतील, गरीबांस सुख होईल, आणि इतर विचारी माणसांस, शक्त्यनुसार त्यांचें अनुकरण करण्याविषयीं थोडीबहुत तरी उपरति होईल. आणि तिच्या योगानें जगांतील सदाचरणवृत्तीच्या वृद्धीस आणि परोपकारांच्या कृत्यास थोडथोडी भर पडत राहील. आणि हें सगळें पुण्य हरिश्चंद्रबाबांच्या खात्यास जमा होईल. त्याचें उत्तम फल ह्मणजे विश्वंभराची कृपा. हा लाभ अप्रतिम आहे, अतुल आहे, ह्याची बरोबरी दुसऱ्या कोणत्याही लाभाच्यानें करवणार नाहीं. इहलोकची नाशिवंत संपत्ति देऊन परलोकची शाश्वत मुक्ति संपादणें हा सवदा फार चांगला आहे, इहपरीं सुखावह आहे, सर्वतोपरी लाभदायक आहे. तो हरिश्चंद्रबाबांनीं केला आहे. त्यांनीं जन्मास आल्याचें सार्थक्य केलें आहे, आणि, आपल्या भाविकांच्या समजुतीप्रमाणें जन्ममर-

णाची येरझार चुकविली आहे. हें एवढें कृत्य साधण्यास त्यांस मुख्य साधन आमच्या संतांचा बोध होय. पंतांनीं ह्मटलें आहे.

### आर्या.

बुध हो सुखदुःखादिक हें सर्वहि होय ईश्वराधीन
जाणुनि असा करावा निश्चय कीं तत्प्रसाद साधीन. १.
दुःख परासि न द्यावें सत्य वदावें क्षमा न सोडावी
जोडावी कीर्ति अशी कुलरीति तुह्मीं कधीं न मोडावी. २.
गति उत्तम होय असें वर्तावें धर्मनीति रक्षावी
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थितिरीति शांति लक्षावी. ३.

त्याप्रमाणेंच **समर्थांनीं** लिहिलें आहे:—

### ओव्या.

ह्मणोनि आळस सोडावा यत्न साक्षेप जोडावा.
दुश्चित्तपणा मोडावा थाराबळें. १.
सावधानता असावी नीतिमर्यादा राखावी.
जनास मानेल ते करावी क्रिया शुद्ध. २.
शरीर परोपकारीं लावावें बहुतांच्या कार्यास यावें.
उणें पडों नचि द्यावें कोणी एकाचें. ३.
मरणाचें स्मरण असावें हरिभक्तीशीं सादर व्हावें
मरोनि कीर्तीस उरवावें येणें प्रकारें. ४.
स्वयें आपण कष्टावें बहुतांचें सोशीत जावें.
झिजोनि कीर्तीसी उरवावें नाना प्रकारें. ५.

तुकाराम महाराजांनीं बोध केला आहे:—

### अभंग.

देह जाईल जाईल यासि काळ बा खाईल. १.
कां रे नुमजसी दगडा कैंचे हत्ती घोडे वाडा. २.

लोडें बालिसें सुपती जरा आलिया फजीती. ३.
शरीरसंबंधाचें नातें भार्या उडविती सेतातें. ४.
आझून तरी होईं जागा तुका ह्मणे पुढें दगा. ५.

क्षणक्षणा हाचि करावा विचार तरावया पार भवसिंधु १.
नाशिवंत देह जाणार सकळ आयुष्य खातो काळ सावधान २.
संतसमागमीं धरूनी आवडी करावी तांतडी परमार्थाची. ३.
तुका ह्मणे इहलोकींच्या वव्हारें नये डोळे धुरें भरुनी राहों. ४.

संसारा आलिया एक सुख आहे आठवावे पाय विठोबाचे. १.
येणें होय सर्व संसार सुखाचा न लागे दुःखाचा लेश कांहीं २.
घेतील तयांसी सोपें आहे सुख बोलियेले मुखें नारायण. ३.
सांगितली सोय करुणासागरें तुह्मां कां हो बरें न वाटे तें. ४.
तुका ह्मणे तेणें उपकार केला भोळया भाविकांला तरावया. ५.

**रामजोशी बावांनीं** आग्रह केला आहेः—

लावणी.

निपट बावळा या विषयाच्या मागें लागसि कसा
कां होशी बा धड पिसा
वयोधनाची किति चंचळ गति कां धरिसी भरंवसा
हें सकळ मनाला पुसा
उदरासाठीं दुर्धनिकाच्या पुढें पसरिसी पसा
किति उगाळिशी कोळसा
हें तुला शिकविलें कुणीं
दयाळ नरनारायण धणी
अजुनि तरि करीं ही घोकणी

[library stamp, illegible]



विषवल्लीची जडी
तूं ह्मणशिल साखरपुडी.

असो. असें सांगावें तितकें थोडें आहे. हें कांहीं साधूंनीं कोणा नियमित माणसांकरितां सांगितलेलें नाहीं. ही त्यांनीं एक मोठी जाहागीर इहलोकीं आणून ठेविली आहे. हिजवर सगळ्या जगाची सत्ता आहे. हिचे कधीं हिसे पडावयाचे नाहींत. हिच्या वांटणीविषयीं कोणी दावा करायाचा नाहीं. राज्यक्रांति झाल्या तरी हिचा भंग व्हावयाचा नाहीं. हिचा उपभोग किती युगें किती पिढ्यांनीं केला, तरी, ही कधीं सरावयाची नाहीं. हिचा उपभोग आणि उपयोग करण्याचें सामर्थ्य मात्र पाहिजे. तें हरिश्चंद्रबाबांसारख्या पुण्यशीलांस देव देतो. तें एकनिष्ठेनें मागितलें ह्मणजे तें तो कोणास ना ह्मणत नाहीं. तें मागण्याची स्फूर्ति ह्या चरित्राच्या वाचकांस होवो, असें देवापाशीं अनन्य भावें मागून हें चरित्र येथें समाप्त करितों.